• पुणे, बुधवार, ०७ ऑगस्ट २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 240 • वर्ष ३ रे, अंक २४० • किंमत ₹ ६ • पाने : १०+२ =१२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



श्रीमंत भाऊसाहेब रंगारी
॥ उत्सवकर्ते ॥



## हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती

# श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट, पुणे.

## वरद विघ्नेश्वर वाडा

## गणेशोत्सव सजावट २०२४






**मा. पुनीत बालन,**
विश्वस्त-उत्सव प्रमुख

## ढोल-ताशा पथकांच्या मदतीला पुनीत बालन धावले

# नुकसान भरपाईची घेतली जबाबदारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





"ढोल-ताशा पथक ही गणेशोत्सवातील प्रमुख ओळख आहेच शिवाय पुण्याचं सांस्कृतिक वैभव आहे. नैसर्गिक आपत्तीत त्यांचं नुकसान झाल्याने त्यांच्या पाठीशी उभं राहणं हे एक गणेशभक्त म्हणून मी माझं कर्तव्य समजतो. याच भावनेतून ढोल-ताशा पथकांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी खारीचा वाटा म्हणून योगदान देता आलं, याचं समाधान आहे."
— पुनीत बालन युवा उद्योजक

**पुणे :** शहरात दोन दिवसांपूर्वी आलेल्या पुरात नदीकाठच्या अनेक ढोल-ताशा पथकांचे साहित्य वाहून गेल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले. या सर्व ढोल-ताशा पथकांच्या मदतीला युवा उद्योजक पुनीत बालन हे धावून आले असून ढोल-ताशा पथकांचे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याची जबाबदारी त्यांनी उचलली आहे.

सांस्कृतिक पुण्यात ढोल-ताशा पथकांना एक वेगळेच महत्त्व आहे. गणेशोत्सवात ढोल-ताशा पथकांचं वादन ऐकण्यासाठी देशभरातील गणेशभक्त आसुसलेले असतात आणि त्याची प्रचिती आपणा सर्वांनाच दरवर्षी येते. ही पथके प्रामुख्याने नदीकाठी असून याच भागात ढोल-ताशा, मंडप, इलेक्ट्रॉनिक्स मशीन इत्यादी साहित्य ठेवण्यात येते. गणेशोत्सवाच्या आधी साधारणपणे दोन-तीन आठवडे नदीकाठावरच ही पथके सराव करत असतात. परंतु दोन दिवसांपूर्वी अचानक आलेल्या पुरामध्ये यातील बहुतांश पथकांचे साहित्य वाहून गेले असून काही पथकांच्या साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. हे मोठे नुकसान कसे भरुन काढावे, या चिंतेत ढोल-ताशा पथकाचे कार्यकर्ते असतानाच त्यांच्या मदतीला युवा उद्योजक आणि 'श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट'चे उत्सवप्रमुख पुनीत बालन हे धावून आले आहेत.

पुनीत बालन यांनी रविवार श्री ओंकारेश्वर मंदिराजवळ या ढोल-ताशा पथकांची आणि गणेशोत्सव मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला आणि झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. तसेच गणपती बाप्पाचा भक्त म्हणून या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचे आश्वासन देऊन त्यांनी चिंतेत असलेल्या ढोल-ताशा पथकांना आश्वस्त केले. त्यांच्या या घोषणेचे ढोल-ताशा पथकांच्या आणि गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी स्वागत केले आणि त्यांचे आभारही मानले. यापूर्वीही पुनीत बालन हे शहरातील सर्वच गणेश मंडळांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहेत आणि यापुढेही आपण असेच ठामपणे उभे राहून सांस्कृतिक पुण्याची ओळख कायम राखण्यासाठी काम करु असा शब्द त्यांनी दिला. यावेळी ढोल-ताशा महासंघाचे संजय सातपुते, नितीन पंडीत, यज्ञेश मंडलिक, शिरीष थिटे, अनुप साठे शिगवान, तेजस पाठक, कमलेश कंठे, विशाल भेलके, मंडलिक, अभिजित कुमावत, मनिष पाडेकर, विशाल घरत, प्रकाश राऊत, अमर भालेराव, अनिश पाडेकर, अविनाश बकाल, विनोद आढाव, मंगेश साळुंखे यांच्यासह ढोलताशा महासंघाचे इतर पदाधिकारी, गणेश मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## ११ ऑगस्ट रोजी गांधी दर्शन शिबीर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने रविवार, दि. ११ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत 'गांधी दर्शन' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूड येथील गांधी भवनच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात हे शिबीर होणार आहे. किशोर बेडकिहाळ (राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि सर्व धर्म समभाव), डॉ.कुमार सप्तर्षी (महात्मा गांधी आणि त्यांचे सहकारी),डॉ. श्याम पठारे (रवींद्रनाथ टागोर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधींचा संवाद) हे मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. 'गांधी दर्शन' विषयावरचे हे तेरावे शिबीर आहे. शिबिरासाठी दोनशे रुपये नोंदणी शुल्क आहे. त्यात शिबिरस्थळी नाश्ता, चहा आणि भोजनाचा समावेश आहे. स्पर्धा परीक्षाची तयारी करणारे युवक युवती आणि महाविद्यालयीन विद्यार्थी यांना विनामूल्य प्रवेश आहे.

» Selected

## सुषमा चोरडिया यांना 'ग्लोबल आयकॉन्स ऑफ इंडिया' पुरस्कार



**पुणे :** कशिश सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व पुण्याचे पॅडमॅन असलेल्या योगेश पवार यांच्या पुढाकारातून दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींचा 'ग्लोबल आयकॉन्स ऑफ इंडिया' या पुरस्काराने सन्मान करण्यात येतो. यंदा हा पुरस्कार 'सूर्यदत्त'च्या सुषमा चोरडिया यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार सोहळ्याचे १६ वे वर्षे होते. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया व उपाध्यक्षा सुषमा चोरडिया यांच्या हस्ते अभिनेता समीर चौघुले, हार्दिक जोशी, चिन्मय उदगीरकर, हर्षद आतकरी, योगेश शिरसाट, मिलिंद शिंत्रे, अभिनेत्री सुरुची अडारकर-रानडे आणि आरजे संग्राम यांचा सन्मान करण्यात आला. प्रसंगी सीमेवर लढताना अपंगत्व आलेले भारतीय लष्करातील जवान सदाशिव घाडगे यांनाही सन्मानित करण्यात आले. प्रसंगी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, कार्यक्रम संचालक पूजा वाघ, अलवीरा मोशन एंटरटेनमेंटच्या दीपाली कांबळे, प्रिया कोसुबकर आदी उपस्थित होते. चित्रपट, फॅशन, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता, शिक्षण, समाजकार्य आदी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना यावेळी सन्मानित करण्यात आले. सुषमा चोरडिया यांचा सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव लक्षात घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 'सूर्यदत्त'च्या स्थापनेपासून संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## दोन दिवसांत ८०३ खड्ड्यांची डागडुजी

### खड्डे बुजवण्यासाठी ३० पथके

**पुणे :** पुणे मनपा पथ विभागाने रात्री वाहतूक कमी झाल्यानंतर खड्ड्यांची डागडुजी अखेर सुरू केली आहे. शनिवारी आणि रविवारी रात्री सुमारे ८०३ खड्डे बुजवण्यात आले आहेत. सुमारे ३३ ठिकाणी खड्ड्यांची संख्या जास्त असल्याने संपूर्ण रस्त्यावरच पॅचवर्क करण्यात आलेआहे. ही माहिती मनपा पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. या खड्ड्यांची गंभीर दखल घेत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका प्रशासनाची बैठक घेत २४ तासांच्या आत खड्डेमुक्त रस्ते करण्याचे आदेश दिले होते.

त्याच दिवशी रात्री साडेदहा वाजता महापालिकेने ही दुरुस्ती मोहीम सुरू केली. सध्या दिवसभर रस्त्यांचे सर्वेक्षण केले जात असून, ज्या भागात खड्डे आहेत. त्या भागात रात्रीच्या वेळी नियोजन केले जात आहे. विशेष म्हणजे, या कामासाठी पथ विभागाने शहरासाठी ३० पथके नेमली आहेत.

### पाऊस थांबताच मोहीम सुरु

मागील आठ दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने सोमवारी दिवसभर उघडीप घेतली. त्यामुळे रस्ते दुरूस्तीच्या कामाला वेग दिला जात आहे. पावसाळ्यात महापालिकेचा हॉट मिक्स प्लांट सतत बंद पडत आहे. तसेच खडी ओली असल्याने डांबराचे मिश्रण रस्त्यांसाठी योग्य ठरत नाही. त्यामुळे पाऊस थांबताच प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्याचे नियोजन पालिकेने केले आहे.



## आंदोलन...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** दोन विद्यार्थ्यांचा डेंग्यू व कावीळ या आजारामुळे अकाली मृत्यू झाला. प्रशासनाच्या या हलगर्जीपणा विरोधात अभाविपने तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले.

## पालिकेच्या निष्काळजीपणावर वसतिगृह प्रशासनावर हल्लाबोल

# विद्यार्थ्यांच्या मृत्यूमुळे; अभाविपचे आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महानगरपालिकेच्या आंबेडकर वसतिगृहात चाललेल्या निष्काळजीपणा व अस्वच्छतेमुळे दोन विद्यार्थ्यांचा डेंग्यू व कावीळ या आजारामुळे अकाली मृत्यू झाला. प्रशासनाच्या या हलगर्जीपणा विरोधात अभाविपने तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले.

सुमारे पाच दिवसांपूर्वी पुण्यातील घोले रोड, शिवाजीनगर येथे स्थित महानगर पालिकेच्या, आंबेडकर वसतिगृहात वास्तव्यास असणाऱ्या दोन विद्यार्थ्यांच्या अकाली मृत्यु ची बाब उघडकीस आली. हा मृत्यू डेंग्यू व कावीळ या आजारामुळे झाला. या विद्यार्थ्यांना डेंग्यू व कावीळ या आजाराची लागण ही वसतिगृहातच झाली असल्याचे लक्षात आले. संबंधित वसतीगृहात अत्यंत अस्वच्छता त्याचबरोबर सोयी सुविधांचा अभाव असणे याही गोष्टी आढळून आल्या. वसतीगृहात स्वच्छता नसल्याने पाण्यामध्ये डेंग्यूच्या डासांची पैदास होऊन त्याचा संसर्ग संपूर्ण वसतिगृहात पसरला. याचबरोबर पिण्याच्या व वापरण्याच्या पाण्यात असणारी अस्वच्छता हे विद्यार्थ्याला कावीळ होण्यास प्रवृत्त करणारे ठरले.

या संपूर्ण विषयात वसतिगृह प्रशासन हे ढिम्म कारभाराचे उत्तम उदाहरण प्रस्तुत करत आहे. वसतिगृह प्रशासनाच्या निष्काळजी कारभारामुळे विद्यार्थ्यांचा मृत्यू होऊन दोन दिवस उलटून गेल्यानंतरही वसतिगृहात ठिकठिकाणी अस्वच्छता आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. या घटनेस सर्वस्वी जबाबदार पुणे महानगरपालिका व वसतीगृह प्रशासन आहे.

अभाविपने केलेल्या आंदोलनात पुढील दोन दिवसात वसतिगृह आणि वसतिगृह परिसर यांची स्वच्छता व्हावी त्याचबरोबर संबंधित दोषींवर कारवाई करून निलंबन करावे. व मृत विद्यार्थ्यांच्या परिवारास नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी मागणी केली आहे.

## एकता नगर परिसर स्वच्छतेला सुरुवात

**पुणे :** खडकवासला धरणातून मुठा नदीत सोडण्यात येणारे पाणी कमी करण्यात आल्याने सिंहगड रस्त्यावरील एकतानगरीमध्ये आलेला पूर ओसरला आहे.सोमवारी दुपारी पाणी कमी होण्यास सुरुवात झाल्यानंतर संध्याकाळी महापालिकेकडून तत्काळ ज्या सोसायट्यांमध्ये पाणी घुसले होते, त्या भागात स्वच्छतेस सुरुवात करण्यात आली. याशिवाय पाणी आल्यानंतरही अनेक सोसायट्यांमधील नागरिक रविवार असल्याने घरीच थांबले होते. त्या नागरिकांसाठी महापालिकेकडून तत्काळ पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करून देण्यात आले, तसेच महापालिकेकडून फिरते दवाखान्याद्वारे वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय काही सोसायटयांच्या पाण्याच्या टाक्याही तत्काळ महापालिकेकडून स्वच्छ करून देण्यात आल्या आहेत. यासाठी महापालिकेकडून जेटिंग मशिन, स्वच्छता कर्मचारी, औषध फवारणीसाठी कर्मचारीही नियुक्त करून देण्यात आले होते. मागील दोन दिवसांपासून खडकवासला धरणसाखळीत मोठ्या प्रमाण पाऊस सुरू असल्याने रविवारी रात्रीपासून मुठा नदीत सुमारे ४५ हजार क्युसेक पाणी सोडण्यात येत होते. त्यामुळे एकतानगरी परिसरातील तीन ते चार सोसायट्यांच्या तळमजल्यात पाणी घुसले होते. मात्र, सोमवारी पहाटे हा विसर्ग ३५ हजार, तर दुपारी तो २१ हजार करण्यात आला. त्यानंतर पुराचे पाणी ओसरण्यास सुरुवात झाली. सायंकाळी पुराचे पाणी पूर्णत: कमी झाल्याने पूर ओसरला होता. सायंकाळी पाणी घुसलेल्या तीन ते चार सोसायट्या वगळता उर्वरीत सर्व १६ सोसायट्यांचा वीजपुरवठाही महावितरणकडून तातडीने सुरू करण्यात आला. नदीत मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने एकतानगरी भागात ३ फायर गाड्या, २ बोटी, १५ जवान सलग दोन दिवस तैनात करण्यात आले होते, तर अग्निशमन दलाकडून प्रत्येक दोन तासाला खडकवासला धरणाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क ठेवून विसर्गाची नियमित माहिती घेतली जात होती. याशिवाय पूर आल्यानंतरही लष्कराच्या जवानांसह अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी अनेकांना बाहेर काढत मोलाची भूमिका निभावली. त्याबाबत या भागातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह सासवड आणि २५० मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह पिंपरी- चिंचवड येथे प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभागाअंतर्गत या दोन्ही वसतिगृहात इयत्ता १२ वी नंतर महाविद्यालयीन प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर नोंदणी करुन भरलेल्या अर्जाची प्रत संबंधित वसतिगृहात ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत जमा करावी. यापूर्वी कनिष्ठ महाविद्यालय व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज केलेल्यांनी देखील या संकेतस्थळावर अर्ज करावेत. वसतिगृह प्रवेश हा प्रवर्गनिहाय गुणवत्तेनुसार राहील. शासकीय वसतिगृहात विनामूल्य निवास, अंथरुण, पांघरुण, भोजन, पुस्तके, स्टेशनरी व इतर शैक्षणिक बाबींकरीता आर्थिक सहाय्य तसेच दरमहा निर्वाह भत्ता आदी सुविधा पुरविण्यात येतात, असे दोन्ही वसतिगृहाच्या गृहपाल यांनी कळविले आहे.

## सहा लाखांची थकबाकी तरी कारवाई नाही

# धक्कादायक ! ठेकेदाराला मुदतवाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

"जय जवान सिक्युरिटी एजन्सीला मुदतवाढ देण्याचा ठराव संचालक मंडळाच्या बैठकीत बहुमताने मंजूर झालेला आहे. तीन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे. दहा विरुद्ध आठ, असा हा ठराव मंजूर झाला आहे.
— डॉ. राजाराम धोंडकर,
सचिव, बाजार समिती, पुणे

पहिल्या तीन वर्षांत ठेक्याची रक्कम ३० लाखांवरून सुमारे २१ लाख ७५ हजारांवर आणली आहे. यामुळे तीन वर्षांत समितीचे अंदाजे २२ लाख ५५ हजारांचे नुकसान झाले. आता ई-टेंडर न राबवता पुन्हा तीन वर्षांसाठी याच ठेकेदाराला मुदतवाढ देण्याचा चुकीचा ठराव अठरा पैकी दहा संचालकांनी बहुमताने मंजूर केला आहे. त्यामुळे समितीचे पुढील तीन वर्षांत सुमारे ४६ लाख २० हजार ९२७ रुपयांचे नुकसान होणार आहे. म्हणून सभापतींसह आम्ही आठ संचालकांनी विरोध केला आहे.
— सुदर्शन चौधरी,
संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे

**पुणे :** जय जवान सिक्युरीटी एजन्सी या ठेकेदाराने मार्च ते जून या कालावधीत सहा लाख १९ हजार १६७ इतकी रक्कम भरलेली नाही. 'ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. वरील वाहनतळ मक्ता, व्याज, जीएसटी व टीसीएसची रक्कम तत्काळ मुख्य कार्यालयात भरावी,' असे लेखा विभागाने सुरक्षा विभागास कळविले आहे. पुणे बाजार समितीने मर्जीतल्या पार्किंग ठेकेदारास मुदत संपण्यापूर्वीच तब्बल तीन वर्षांची मुदतवाढ दिल्याचा प्रकार समोर आला आहे. टेंडर प्रक्रिया 'बायपास' करण्यासाठी मुदतवाढीचा नवीन फंडा संचालकांनी सुरू केला असल्याची चर्चा बाजारात सुरू आहे.या ठेकेदाराने समितीचे सहा लाख रुपये थकविले आहेत. तरीही त्याच ठेकेदाराला मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुणे बाजार समितीने गुलटेकडी येथील मुख्य बाजार आवारातील प्रवेशद्वार क्रमांक चार जवळ बटाटा शेडलगत सुमारे चार एकर मोकळ्या जागेत दुचाकी, तीन चाकी, चारचाकीसाठी वाहनतळ उभारले आहे. मार्च २०२२ मध्ये बाजार समितीने जय जवान सिक्युरिटी एजन्सी यांना तीन वर्षांसाठी ३० लाख रुपयांना हा वाहनतळाचा ठेका दिला.

त्यानंतर तत्कालीन प्रशासक मधुकांत गरड यांनी या ठेक्याची रक्कम सुमारे नऊ लाखांनी कमी करत २१ लाखांवर आणली. त्यानंतर ठेकेदाराने ठरवून दिलेल्या जागेशिवाय मिळेल त्या मोकळ्या जागेवर लावलेल्या वाहनांमधून पार्किंग शुल्क वसुली करीत असल्याची तक्रार काही संचालकांनी केली आहे. पहिली मुदत संपण्यास सात महिन्यांचा कालावधी शिल्लक असताना संचालक मंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत या ठेकेदाराला मुदतवाढ देण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला आहे.

## ज्येष्ठ पत्रकारांना सन्माननिधी मिळवून देणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील ज्या ज्येष्ठ पत्रकारांना राज्य सरकारने मंजूर केलेला सन्माननिधी अद्याप मिळालेला नाही, त्यांना हा सन्माननिधी लवकरात लवकर मिळून दिला जाईल," असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.पुण्यातील पूरस्थितीची पाहणी आणि आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी (दि. ५) पुणे दौऱ्यावर होते. यावेळी पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. "राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांना सन्मान निधी दिला जातो. राज्य सरकारने ११ हजार रुपयांचा निधी २० हजार रुपये केला आहे.

परंतु, हा पुण्यातील काही ज्येष्ठ पत्रकारांना हा निधी अद्याप मिळालेला नाही. अशा ज्येष्ठ पत्रकारांना राज्य सरकारने हा निधी द्यावी," अशा मागणीचे निवेदन संघाचे पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनीत भावे, सरचिटणीस मीनाक्षी गुरव यांनी मुख्यमंत्र्यांना यावेळी दिले.याप्रसंगी संघाचे खजिनदार शिवाजी शिंदे, कार्यकारिणी सदस्य अनिल खुडे उपस्थित होते.

## पुणे - मुंबई द्रुतगती मार्गावर अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी

# आयटीएमएस' यंत्रणा ठरणार जीवनदायिनी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे - मुंबई द्रुतगती मार्गावर होणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी व्हावे म्हणून राज्य सरकारकडून सुमारे ३४० कोटी रुपये खर्चून 'आयटीएमएस' यंत्रणा सुरू केली जात आहे. यात केवळ वाहनांच्या वेगावर लक्ष ठेवण्यात येणार आहे, असे नाही तर रस्त्यावर बसविण्यात आलेल्या सेन्सर मुळे एखादे वाहन रस्त्याच्या कडेला थांबले असेल तर त्याचे ठिकाण व अन्य माहिती नियंत्रण कक्षाला समजणार आहे. यासाठी ९४.५ किलोमीटरच्या या मार्गावर १०६ ठिकाणी एकूण ४३० कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कुसगाव येथे यासाठी विशेष असे 'नियंत्रण कक्ष' देखील स्थापन केले आहे. त्यातून 'आयटीएमएस'चे काम चालणार आहे. वेगाने वाहन चालविणे, लेन कटिंग करणे आदींसह एकूण १७ प्रकारच्या वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई केली जाणार आहे. यासाठी पाच प्रकारच्या कॅमेऱ्यांचा वापर करण्यात आला आहे.

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर वाहनांवर नजर ठेवण्यासाठी कॅमेरा व सेन्सर आता सज्ज झाले आहेत. 'आयटीएमएस'चे (इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम) काम पूर्ण झाले असून त्याची सध्या चाचणी सुरू झालेली आहे.ऑगस्ट अखेरीस 'आयटीएमएस' प्रणाली पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल. अशी प्रणाली असलेला द्रुतगती मार्ग हा राज्यातील पहिला महामार्ग ठरला आहे. यामुळे 'आयटीएमएस'मुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

### अपघात कमी होण्यास मदत

● वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पुणे - मुंबई द्रुतगती मार्गावर 'आयटीएमएस' प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला. मार्गावर वाहतुकीची शिस्त पाळली जावी, अपघात टळावेत, अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळावी, तसेच पथकर वसुली जलद, अचूक, तसेच पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा बसविण्यात येणार आहे. मार्गावर अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे असल्याने वाहनावर लक्ष ठेवणे सोपे जाते. वाहनांचा वेग तपासणारी 'अॅव्हरेज स्पीड डिटेक्शन सिस्टीम' तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांचा शोध घेणारी 'लेन डिसिप्लीन व्हायलेशन डिटेक्शन सिस्टीम' असल्याने अपघात कमी होण्यास मदत होते. त्यामुळे 'आयटीएमएस' असणे महत्त्वाचे आहे.


#रा

• पुणे, बुधवार, ०७ ऑगस्ट २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 240 • वर्ष ३ रे, अंक २४० • किंमत ₹ ६ • पाने : १०+२ =१२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS




## At a Glance

### लालूप्रसाद यादव विरोधात आरोपपत्र

**नवी दिल्ली :** माजी रेल्वेमंत्री लालूप्रसाद यादव, त्यांचे पुत्र तेजस्वी यादव यांच्यासह आठ जणांविरोधात सक्तवसुली संचालनालयाने पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे.विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांच्यासमोर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी १३ ऑगस्ट रोजी ठेवली आहे.

### मनीष सिसोदियांचा जामीन अर्ज फेटाळला

**नवी दिल्ली :** दारु घोटाळ्याप्रकरणी १७ महिन्यांपासून तुरुंगात असलेले दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावला. खटल्याला उशीर होत असल्याचे कारण देत सिसोदिया यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे दिलासा मागितला आहे. खटल्याच्या विलंबासाठी यंत्रणांनी » पान ७ वर

### कुपवाडा स्फोटात दोन महिला जखमी

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील सुरक्षा दलांच्या छावणीजवळ मंगळवारी झालेल्या स्फोटात दोन महिला जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. नाहिदा अख्तर आणि अफरोजा बेगम अशी जखमी महिलांची नावे आहेत, त्या दोघी कुपवाडा येथील गुजरपती भागातील चेक कीगाम येथील रहिवासी आहेत.

### राष्ट्रपती भवनाचे अमृत उद्यान खुले

**नवी दिल्ली :** राष्ट्रपती भवनातील प्रतिष्ठित अमृत उद्यान १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर या कालावधीत जनतेसाठी खुले केले जाईल, असे राष्ट्रपती भवनाने मंगळवारी सांगितले. केंद्रीय सचिवालय मेट्रो स्टेशन ते गेट क्र. ३५ (उद्यानासाठी प्रवेशद्वार) देखील अभ्यागतांच्या सोयीसाठी उपलब्ध असेल, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे.

# शेख हसीना भारतातच!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशात हिंसाचार सुरूच आहे. शेख हसीना यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन त्या भारतात आल्या आहेत. इंग्लंड किंवा फिनलँडमध्ये आश्रय घेण्याच्या त्या प्रयत्नात आहेत. त्याचवेळी, बांगलादेशाची कमान लष्कराच्या हातात असून, अंतरिम सरकार स्थापनेसाठी प्रयत्न सुरू आहेत. आंदोलक विद्यार्थी संघटनेने अंतरिम सरकारचे नेतृत्व नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस करणार असल्याचे जाहीर केले आहे. याशिवाय विरोधी पक्षनेत्या बेगम खालिदा झिया यांची तुरुंगातून सुटका करण्याचे आदेशही राष्ट्रपतींनी जारी केले आहेत.

विद्यार्थी चळवळीचे नेते असलेल्या नाहिद इस्लाम, आसिफ महमूद, अबू बकर मजुमदार यांनी डॉ. युनूस यांच्या नावाची घोषणा केली. या तिघांनी आज सकाळी एक व्हिडिओ संदेश जारी केला आणि डॉ. युनूस हंगामी सरकारचे नेतृत्व करतील असे सांगितले.

आरक्षण पद्धतीत बदल करण्याची मागणी जोर धरू लागली, तेव्हा शेख हसीना यांनी त्याकडे लक्ष दिले नाही, असा आरोप युनूस यांनी केला. ही मागणी



करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. यामुळे लोक भडकले आणि हिंसाचाराचे वातावरण निर्माण झाले, असे समर्थन त्यांनी केले.

### युनूस विरोधात १९० गुन्हे दाखल

● अवामी लीग सरकारच्या काळात युनूस विरोधात एकूण १९० गुन्हे दाखल करण्यात आले होते. डॉ. युनूस म्हणाले की, शेख हसीना यांनी त्यांचे वडील शेख मुजीबुर रहमान यांचा वारसा नष्ट केला. बांगलादेशात सुरू असलेल्या अशांततेचेही त्यांनी समर्थन केले. आज आंदोलक आपला संताप व्यक्त करत आहेत. हेच विद्यार्थी आणि तरुणच आज देशाला योग्य दिशेने नेण्यासाठी प्रयत्न करतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### कोल-ढाका मैत्री एक्स्प्रेस बंद

● बांगलादेशात अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या अशांततेमुळे भारत आणि बांगलादेश दरम्यानची रेल्वे सेवा ठप्प झाली आहे. बांगलादेशची राजधानी ढाका येथील हिंसाचार आणि त्यांच्या सरकारी निवासस्थानावर झालेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान शेख हसीना यांनी देश सोडल्यानंतर, कोलकाता-ढाका मैत्री एक्स्प्रेसची सेवा मंगळवारीही बंद राहणार आहे.

### अमेरिकेकडे इशारा

शेख हसीना यांनी बांगलादेशातील उठावाच्या तीन महिन्यांपूर्वी आपल्या राजकीय पतनाची भविष्यवाणी केली होती. आपले सरकार पाडण्याचे षडयंत्र रचले जात असून, आपले वडील आणि स्वातंत्र्यवीर शेख मुजीबुर रहमान यांच्याप्रमाणे आपलीही हत्या होऊ शकते, अशी भीती त्यांनी व्यक्त केली होती. बांगलादेश आणि म्यानमारचे विलीनीकरण करून नवा ख्रिश्चन देश निर्माण करण्याचा 'गोरा माणूस' कट रचत असल्याचा आरोपही त्यांनी केला होता. जर मी एखाद्या विशिष्ट देशाला बांगलादेशात एअरबेस उभारण्याची परवानगी दिली असती, तर मला अडचण आली नसती. तथापि, त्यांनी कोणत्याही देशाचे नाव घेतले नव्हते. मात्र, त्या अमेरिकेकडे बोट दाखवत असल्याचे संकेत त्यांच्या बोलण्यावरून मिळाले होते.

### इंग्लंडने दिला नकार

बांगलादेशाच्या पंतप्रधान म्हणून काम पाहिलेल्या शेख हसीना आज सुरक्षित आश्रय शोधत आहेत. सोमवारी त्यांनी पदाचा राजीनामा दिला आणि त्या भारतात आल्या. सध्या त्या भारतातच आहेत. त्यांना इंग्लंडमध्ये आश्रय घ्यायचा आहे, जिथे त्यांची बहीण आणि मुले राहतात, असे म्हटले जाते. मात्र, इंग्लंडने त्यांना धक्का दिला आहे. आमचे इमिग्रेशन नियम एखाद्या व्यक्तीला आश्रयासाठी येण्याची किंवा तात्पुरते राहण्याची परवानगी देत नाहीत, असे विधान इंग्लंडच्या गृह मंत्रालयाने केले आहे. तसेच ज्या देशात शेख हसीना पहिल्यांदा सुखरूप पोहोचला, त्या देशातच असा आश्रय मागितला जावा, असे म्हणत भारतानेच त्यांना संरक्षण देण्याचे इंग्लंडने सुचवले आहे.

### दंगलीचे चित्र भयावह

बांगलादेशमध्ये शेख हसीना सरकारच्या सत्तांतरानंतर उसळलेल्या दंगलीचे भयावह चित्र जगाला चिंतेत टाकणारे आहे. बांगलादेशातील राजकीय घडामोडींवर सरकार बारकाईने लक्ष ठेवून असून, कायदा व सुव्यवस्थेची स्थिती सुरळीत होईपर्यंत भारताला त्याची चिंता राहील, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी मंगळवारी राज्यसभेत सांगितले. बांगलादेशात अजूनही १९ हजार भारतीय नागरिक अडकले असून, त्यातील बहुतांश विद्यार्थी आहेत. आम्ही त्यांच्या सतत संपर्कात आहोत, असेही ते म्हणाले.

बांगलादेशातील घडामोडींवर राज्यसभेत वक्तव्य करताना जयशंकर म्हणाले की, शेजारच्या देशातील राजकीय घडामोडी चिंतेचा विषय असून, सरकार तेथे राहणाऱ्या भारतीयांच्या सातत्याने संपर्कात आहे. १९ हजार भारतीय नागरिक तेथे आहेत, त्यापैकी सुमारे ९ हजार विद्यार्थी असून, त्यापैकी बरेच जुलैमध्ये परतले आहेत. अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेसाठी अनेक गट आणि संघटना पावले उचलत असल्याच्या बातम्या येत आहेत. बांगलादेशातील गुंतागुंतीची परिस्थिती पाहता सीमेवर तैनात सुरक्षा दलांना अत्यंत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले.

# उद्धव ठाकरे यांची दिल्लीवारी खर्गे, सोनियांची घेणार भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उबाठा गटाचे प्रमुख उद्धव



ठाकरे हे तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात आगामी विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस श्रेष्ठींशी चर्चा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. शिवाय जागावाटपाबाबतही या भेटीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

दिनांक ६, ७ आणि ८ ऑगस्ट हे तीन दिवस उद्धव ठाकरे दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरेसुद्धा दिल्लीला जाणार आहेत. यावेळी ते काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, राहूल गांधी, सोनिया गांधी यांच्यासह अनेक जणांच्या भेटी घेणार आहेत. यावेळी इंडिया आघाडीच्या अनेक नेत्यांसोबत चर्चा होणार आहे, असे प्रवक्ते संजय राऊत यांनी सांगितले.

दरम्यान, लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणूकाही महाविकास आघाडी एकत्र लढवणार आहे. शरद पवारांनी काँग्रेस आणि उबाठा गटाला प्रत्येकी १०० जागा लढवण्याचा प्रस्ताव दिल्याचीही माहिती पुढे आली आहे. उद्धव ठाकरेंच्या दिल्ली दौऱ्यात जागावाटपाविषयी काही ठरणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सोनिया दर्शनासाठी दिल्लीवारी : दरेकर

● उद्धव ठाकरेंची दिल्लीवारी ही सोनिया दर्शनासाठी असल्याची खरमरीत टीका प्रवीण दरेकरांनी केली आहे. पत्रकारांशी संवाद साधताना दरेकर म्हणाले की, श्रावणात आपण देवदर्शन करतो. परंतु उद्धव ठाकरे दिल्लीत सोनिया दर्शन करायला गेले असावेत. एकीकडे दिल्लीचेही तख्त राखीतो महाराष्ट्र माझा, अशा प्रकारची राणाभीमदेवी थाटात गर्जना करायची. दुसऱ्याला दिल्लीश्वरांच्या पायाशी गेले म्हणून टोमणे मारायचे. आता उद्धव ठाकरे स्वतः तीन दिवस दिल्लीश्वरांच्या खेटा मारणार आहात, त्याबाबत महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेला ते काय सांगणार आहात, असा सवालही दरेकरांनी केला आहे.

## पूजा खेडकरांवर अब्रुनुकसानीचा दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी लैंगिक छळ केल्याचा आरोप प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी केला होता. तशी तक्रार पुजा खेडकर यांनी पोलिसांना दिली असून, यूपीएससीकडे देखील तशी तक्रार केली होती. दरम्यान, त्याबाबत आता पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे पूजा खेडक यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहेत.

प्रशिक्षण कालावधीत सुहास दिवसेंनी छळ केल्याचा पूजा खेडकर यांचा आरोप आहे. दरम्यान, या आरोपांबाबत चौकशी करणाऱ्या पुणे पोलिसांनी तीन वेळा समन्स बजवून देखील त्या हजर झालेल्या नव्हता. त्यांची बदली वाशिमला झाल्यावर त्यांनी तिथे जिल्ह्याधिकारी दिवसे यांच्याविरोधात छळ केल्याची तक्रार दिली होती.

# तर जरांगे हे शरद पवारांचेच : आंबेडकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे : अकोला :** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणूक लढवली नाही, तर ते शरद पवारांचा माणूस आहेत, यावर शिक्कामोर्तब होईल, असा घणाघात वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केला. प्रकाश आंबेडकर यांनी सध्या आरक्षण बचाओ यात्रा सुरू केली असून, ते अकोला येथे बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मराठा समाजाला ओबीसींच्या कोट्यातून आरक्षण द्यावे, या मनोज जरांगेंच्या मागणीसंदर्भात भाजपने भूमिका घेतली नाही. उद्धव ठाकरेंनी यावर मजेशीर भूमिका घेतली. त्यांनी ओबीसींना पंतप्रधान मोदींकडे जाण्यास सांगितले. त्यांच्याकडून टक्केवारी वाढवून घ्या आणि त्यानंतर मराठ्यांना ओबीसींमध्ये घ्या आणि आरक्षण देऊन मोकळे व्हा, असा सल्ला दिला आहे. म्हणजेच कोंबडीच्या खुराड्यात कोल्हा सोडला तर एकही कोंबडी शिल्लक राहणार नाही. अशी ठाकरेंच्या शिवसेनेची भूमिका आहे, असा टोला त्यांनी लगावला.

ते म्हणाले की, जरांगे पाटील यांनी अवघड जागेचे दुखणे बनण्याची सुरुवात केली आहे. दुर्दैवाने ओबीसींचे आरक्षण हे बळीचा बकरा झालेले आहे. श्रीमंत मराठा आणि गरीब मराठ्यांचे भांडण आहे. हळूहळू जरांगे पाटील हे शरद पवारांचा माणूस असल्याचं म्हटले जात आहे. ते निवडणूक लढले नाहीत, तर हा स्टँप पक्का झाला असे समजायचे. त्यांना शरद पवारांनी उभे केले. त्यांच्या भांडणात ओबीसींनी बळी द्यायचा का? किमान १०० ओबीसींचे आमदार निवडून यायला हवेत, असे आवाहनही त्यांनी केले.

हायकमांडचे आदेश; पाच आमदारांचा समावेश

# क्रॉस व्होटिंग करणाऱ्यांचे तिकीट काँग्रेसने कापले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दि. १२ जुलै रोजी झालेल्या विधान परिषद निवडणुकीत क्रॉस व्होटिंग करणाऱ्या काँग्रेस आमदारांवर पक्षनेतृत्वाने कारवाई केली आहे. या पाच जणांना आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसकडून तिकीट दिले जाणार नाही. त्यांच्या मतदारसंघामध्ये दुसरा उमेदवार शोधण्याची सूचना प्रदेशाध्यक्षांना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ११ रिक्त जागांसाठी झालेल्या निवडणुकीत काँग्रेससह शरद पवार गटाची मते फुटल्यामुळे महाविकास आघाडीला मानहानिकारक पराभवाला सामोरे जावे लागले.

त्याचवेळी महायुतीचे सर्व उमेदवार निर्धारित कोट्यापेक्षा दोन ते तीन मते मिळवून विजयी झाल्यामुळे अनेकांनी कपाळाला हात लावला. देवेंद्र फडणवीस यांनी अचूक गणितीय मांडणी करीत मविआला पुन्हा दणका दिला. याची गंभीर दखल घेत काँग्रेस पक्षनेतृत्वाने, क्रॉस व्होटिंग करणाऱ्या आमदारांवर कारवाईचा इशारा दिला होता. त्यानुसार, के. सी. वेणुगोपाल आणि रमेश चेन्नितला यांनी महाराष्ट्राचा दौरा करून क्रॉस व्होटिंग प्रकरणाचा अहवाल तयार केला. त्यात आमदार सुलभा खोडके, झिशान सिद्दीकी, हिरामण खोसकर, जितेश अंतापूरकर, » पान ७ वर

## एसटी कर्मचाऱ्यांचा ९ ऑगस्टपासून संप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी पुन्हा एकदा संपावर जाणार आहेत. राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी संप पुकारला आहे. येत्या ९ऑगस्टपासून एसटी महामंडळातील १३ संघटनांनी संप पुकारला असून, या संपाचा फटका राज्यभरातील प्रवाशांना बसणार आहे.

एसटी महामंडळ तोट्यात आहे. महामंडळाला कोरोना काळानंतर सन २०२०-२१ मध्ये सहा हजार कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला. त्यानंतर तो कमी झाला नाही. आता तो ९ हजार कोटी रुपयांवर गेला आहे. एसटीच्या उत्पन्नापेक्षा खर्च अधिक आहे. तसेच एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी परिवहन महामंडळाला राज्य सरकारवर अवलंबून राहावे लागते. » पान ७ वर

## कांदा निर्यात अडचणीत

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पुणे: बांगलादेशातील राजकीय घडामोडींमुळे भारतातील कांदा निर्यातदार चिंतेत आहेत. निर्यात शुल्क आणि किमान निर्यात किंमतमुळे बांगलादेशला होणारी निर्यात आधीच घसरली होती.

## जीएसटी मागे घेण्यासाठी निदर्शने

**नवी दिल्ली :** जीवन आणि आरोग्य विम्याच्या हप्त्यावरील १८ टक्के वस्तू व सेवा कर (जीएसटी) मागे घ्यावा, या मागणीसाठी इंडिया आघाडीतील घटक पक्षांनी मंगळवारी संसदेच्या आवारात निदर्शने केली. तृणमूल काँग्रेस, काँग्रेस, आप, राष्ट्रवादी काँग्रेस अशा विविध पक्षांचे खासदार या आंदोलनात सहभागी झाले होते.'टॅक्स टेररिझम' असे लिहिलेले फलक हातात घेऊन आंदोलक खासदारांनी जीवन आणि आरोग्य विम्याच्या हप्त्यावरील जीएसटी मागे घ्यावा, अशी मागणी करत घोषणाबाजी केली. तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी हा मुद्दा संसदेत उपस्थित केला असून, ममता बॅनर्जी यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना याबाबत पत्र लिहिले आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही सीतारामन यांना पत्र लिहून जीएसटी मागे घेण्याचा विचार करण्याची विनंती केली आहे.

राजकीय पक्षांनी केले आमदारांचे सर्वेक्षण

# विधानसभेची आचारसंहिता सप्टेंबरमध्ये?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात लागणार असल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली. सध्या प्रशासकीय कामांना वेग आला आहे. तर, दुसरीकडे राजकीय पक्षांनी आपापल्या आमदारांचा सर्वेक्षण अहवाल करून घेतला आहे. निवडून येईल याच निकषावर उमेदवारी देणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे १०५ आमदार निवडून आले होते. आता भाजप १५० जागा लढविण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे घटक पक्षांनी नाराजी व्यक्त केली आहे. महायुतीला २०० जागा मिळणार असल्याचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुण्यातील महाअधिवेशनात सांगितले. कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी अशा प्रकारे विधान करण्यात आले, असे मानले जाते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागण्याचे आदेश यापूर्वीच दिले आहेत.

आचारसंहिता लवकरच लागणार असल्याने उमेदवारांना प्रचारासाठी वेळ मिळावा, यासाठी जागावाटप बोलणी अंतिम टप्प्यात आहे. लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुका विधानसभा निवडणुकीत टाळता याव्यात, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. महाविकास आघाडीला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळाले. शिवसेना (ठाकरे गट) ९, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष ८, काँग्रेस १३ अशा ३० जागा मिळाल्या. १ जागा काँग्रेसच्याच अपक्ष उमेदवाराने जिंकली. भाजपला केवळ १७ जागांवर समाधान मानावे लागले. उमेदवार जाहीर करताना मोठ्या प्रमाणात वेळ झाला होता. त्यामुळे प्रचाराला वेळ लागला. काही उमेदवारांना मतदारसंघात पोहोचताही आले नाही.

यंदाची विधानसभा निवडणूक महाविकास आघाडी आणि महायुती, मनसे अशी होणार आहे. लोकसभा निवडणुकीत मनसेने पंतप्रधान मोदी यांच्या यांना पाठिंबा दिला होता. विधानसभा निवडणुकीत मात्र, मनसे २२५ ते २५० जागा लढणार असल्याचे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केले आहे.

## डॉ. माशेलकर यांना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र कीर्ति सौरभ प्रतिष्ठान आयोजित बाबासाहेब पुरंदरे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी देण्यात येणारा तिसरा शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार जेष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांना आणि श्रीमंत मोरेश्वर बळवंत पुरंदरे शिष्यवृत्ती इतिहास अभ्यासक प्रदीप संजय पाटील यांना प्रदान करण्यात येणार आहे.

रविवारी सिम्बॉयसिस विश्वभवन सभागृह, सेनापती बापट रोड, पुणे येथे सकाळी ११ वाजता हा पुरस्कार सोहळा होणार आहे. या सोहळ्याला गो. ब. देगलूरकर, » पान ७ वर

# वक्फ कायद्यात होणार चाळीस सुधारणा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विरोधकांच्या प्रतिक्षेपाच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकार वक्फ कायदा १९९५ मध्ये ४० सुधारणा सुचविणारे विधेयक ८ ऑगस्ट रोजी संसदेत मांडण्याची शक्यता आहे. धार्मिक कारणांसाठी दान केलेल्या मुस्लिम मालमत्तेचे व्यवस्थापन करणाऱ्या वक्फ बोर्डांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लैंगिक प्रतिनिधित्व वाढविण्याचा प्रस्ताव या कायद्यात आहे. ८ ऑगस्टरोजी हे विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. काही कारणास्तव ते होऊ शकले नाही, तर या आठवड्याच्या अखेरीस हे विधेयक मांडले जाऊ शकते.

प्रस्तावित सुधारणांमध्ये वक्फ मालमत्तेची अधिक प्रभावी देखरेख आणि व्यवस्थापन सुनिश्चित करणाऱ्या तरतुदींचा समावेश असणे अपेक्षित आहे. वक्फ मालमत्तेच्या वापरात पारदर्शकता वाढवणे आणि उत्तरदायित्वाचे कठोर उपाय योजणे हा या विधेयकाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. याव्यतिरिक्त, या विधेयकात वक्फ बोर्डांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढविण्याचा प्रयत्न केला आहे, जे लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्याच्या व्यापक प्रयत्नांशी सुसंगत आहे. » पान ७ वर

# विश्ववेध

## मीठ कमी करणारा चमचा

मिठाशिवाय जेवण अळणी होते; पण आहारातून मिठाचे अत्याधिक सेवन हे आरोग्यासाठी धोकादायकही ठरते. अनेक वेळा आपल्याला जेवणात अतिरिक्त मीठ आहे, हे समजत नाही. अर्थात त्यासाठी अन्न खारटच असावे लागते, असे काही नाही. गरजेपेक्षा अधिक मीठ असेल, तर ते कमी करण्यासाठी आता जपानी संशोधकांनी एक विशेष चमचा तयार केला आहे. हा इलेक्ट्रिक चमचा जेवणातील हे अतिरिक्त मीठ कमी करतो आणि तेही चव न बिघडवता! सध्या तंत्रज्ञान इतकं पुढे गेलं आहे की, जवळ जवळ सगळ्याच गोष्टी आता इलेक्ट्रिकच्या रूपात मिळू लागल्या आहेत.



आपण दात घासण्यासाठी जो टूथब्रश वापरतो, तो सुद्धा आता इलेक्ट्रिकच्या रूपात आला आहे. अशातच आता सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होतोय. ज्यामध्ये हा इलेक्ट्रिक चमचा असून, तो जेवणात असणाऱ्या मिठातील सोडियमचे अतिरिक्त प्रमाण कमी करण्यास मदत करणार आहे. जपानच्या किरिन होल्डिंग्स नावाच्या कंपनीने हा इलेक्ट्रिक चमचा तयार केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार हा चमचा आरोग्यासाठी लाभदायक असून, जेवणात वापरल्या जाणाऱ्या मिठातील सोडियमचे प्रमाण कमी करतो. ज्यामुळे जेवण आरोग्यदायी राहते. त्याच बरोबर जेवणाची चव कुठेही कमी होणार नसल्याचे देखील कंपनीकडून सांगण्यात आले आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार हा इलेक्ट्रिक चमचा लवकरच बाजारात येणार असून, तो १९८०० येन इतक्या किमतीत मिळणार आहे.

भारतीय चलनानुसार जर बोलायच झालं तर १०,५०० रु. मध्ये ग्राहकांसाठी उपलब्ध होणार आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार येत्या ५ वर्षांत एकूण १ दशलक्ष ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा त्यांचा उद्देश आहे. सुरुवातीला हा इलेक्ट्रिक चमचा फक्त जपानमध्ये विकला जाणार असून, पुढच्या वर्षापासून इतर देशांमध्ये त्याची विक्री सुरू होईल. हा चमचा प्लास्टिक व धातूचा वापर करून तयार करण्यात आला आहे. तसेच हा चमचा बनवण्यासाठी जपानच्या मेजी विद्यापीठात अध्यापन करणाऱ्या प्रोफेसर होमी मियाशिता यांची देखील मदत घेण्यात आली आहे.

## पॉपकॉर्नचा इतिहास




पॉपकॉर्न म्हणजे मक्याच्या भाजलेल्या लाह्या. सध्याच्या काळात पॉपकॉर्नला जगातला सर्वांत लोकप्रिय स्नॅक्स म्हटलं, तरीही चालेल. चित्रपट पाहताना असो वा संध्याकाळी चहाच्या वेळी, बागेत असो वा गप्पा मारताना पॉपकॉर्न प्रत्येक वेळेसाठी आणि वातावरणासाठी एकदम झकास स्नॅक्स आहे, याबाबत कुणाचं दुमत नसेल. बरं पॉपकॉर्न हे पचायला पण हलके आणि आरोग्यदायी असतात. जर तुम्हाला आवडत असेल तर तुम्ही त्यात मीठ आणि लोणी टाकू शकता; पण त्यानं हा आरोग्यदायी गुण अबाधित राहणार नाही. पॉपकॉर्न फक्त आपल्याच देशातच नाही, तर जगात सगळीकडं खाल्लं जातं. याचा सर्वात जुना संदर्भ अमेरिका खंडात सापडतो. उत्तर आणि दक्षिणी अमेरिकेमध्ये रेड इंडियन ज्या ठिकाणी राहत होते त्या ठिकाणी पॉपकॉर्नचे दाणे सापडले, असं सांगितलं जातं. एक किस्सा तर असा पण सांगितला जातो की, जेव्हा हे दाणे पुरातत्त्व वैज्ञानिकांना सापडले, तेव्हा त्यांनी ते भाजण्याचा प्रयत्न केला होता.

गंमत म्हणजे हजार वर्ष जुने असलेले दाणे गरम झाल्यानंतर लगेच फुटले. याचं कारण म्हणजे दाण्यांचं वरचं आवरण हे जाड असतं. साधारणतः २०० डिग्री तापमानावर हे दाणे फुटतात आणि त्याचा पॉपकॉर्न तयार होतो. आज पूर्ण जगाला पॉपकॉर्ननं वेड लावलं आहे. एक अमेरिकन नागरिक वर्षाला सरासरी पन्नास लिटर पॉपकॉर्न खातो, असं म्हटलं जातं. तर ब्रिटनमध्ये गेल्या पाच वर्षांत पॉपकॉर्नच्या विक्रीमध्ये १६९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसं पाहायला गेलं तर याचा इतिहास अगदी पुरातन आहे. पण, सर्वात आधी पॉपकॉर्न खाण्याची सुरुवात अमेरिकेत झाली, असं म्हणतात.

अमेरिकेचे मूळ निवासी पॉपकॉर्न खात असत. त्याठिकाणी गेलेल्या युरोपीय लोकांनी देखील पॉपकॉर्न खाण्यास सुरुवात केली.जर तुम्हाला याबाबत काही गैरसमज असतील, तर चला ते दूर करून घेऊ. पहिली गोष्ट पॉपकॉर्न त्या मक्याच्या कणसापासून बनत नाही जे आपण नेहमी खातो. पॉपकॉर्न एका मक्याच्या विशिष्ट जातीपासून बनवतात. वायव्य अमेरिकेतल्या काही गुहांमध्ये वैज्ञानिकांना मक्याचे दाणे सापडले होते. तसंच दक्षिण अमेरिकेतही असा मका खात असावेत, असं म्हटलं जातं. प्रसिद्ध वैज्ञानिक थॉमस हार्पर गुडस्पीड यांनी याबाबत काही गंमतीशीर तथ्य सांगितली आहेत. १९४१ मध्ये त्यांनी एक पुस्तक लिहिलं. संशोधन करत असताना चिलीच्या वैज्ञानिकांनी त्यांना १००० वर्ष जुने पॉपकॉर्नचे दाणे मिळाल्याचं प्लांट हंटर्स इन द अँडीज या पुस्तकात लिहिलं आहे.

## बॉवेल डिसीजचे गूढ उलगडले

एखाद्या आजाराचे निदान होणे, हे जसे योग्य वेळी उपचार होण्यासाठी महत्त्वाचे असते, तसेच एखाद्या आजाराचे कारण माहिती असणेही, त्यापासून बचाव करण्यासाठी महत्त्वाचे असते. आता इन्फ्लेमेटरी बॉवेल डिसिज हा आतड्यांचा गंभीर आजार होण्यामागचं प्रमुख कारण यूकेच्या संशोधकांनी शोधून काढलं आहे. हा आजार असलेल्या लोकांपैकी ९५ टक्के जणांच्या डीएनएमध्ये संशोधकांना एक कमकुवत ठिपका आढळला आहे. त्यामुळे काही रोगप्रतिकार पेशींना आतड्यांमध्ये अतिरिक्त इन्फ्लेमेशन (एक प्रकारची सूज, जळजळ, दाह) निर्माण करणं शक्य होतं. संशोधकांच्या टीमला आधीच अस्तित्वात असणारी औषधे सापडली आहेत, जी या आजाराला बरं करत असल्याचं प्रयोगशाळेतून प्रयोगांमध्ये दिसून आलं आहे. या औषधांची आता मानवी शरीरावर चाचणी घेतली जाणार आहे.



क्रोन्स डिसिज आणि अल्सरेटीव्ह कोलायटीस हे इन्फ्लमेटरी बॉवेल डिसिज म्हणजे आतड्यांच्या आजाराचे सर्वाधिक आढळणारे प्रकार आहेत. यूकेमधील जवळपास पाच लाख लोकांना हा आजार होत असल्याचा अंदाज आहे. किशोर वयात किंवा तरुणपणात याची अनेकदा सुरुवात होते.

इन्फ्लेमेटरी बॉवेल डिसिज या आजारात रोगप्रतिकार व्यवस्थेचा अत्यंत गुंतागुंतीचा एक भाग म्हणजे मॅक्रोफेजेस नावाच्या पांढऱ्या रक्त पेशी. या पेशी आतड्याच्या आतील भागाला म्हणजे अस्तरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढतात आणि सायटोकाईन्स नावाचं रसायन सोडतात. यातून मोठ्या प्रमाणात इन्फ्लेमेशन होतं म्हणजे खूप जास्त प्रमाणात जळजळ होते किंवा वेदना होतात. फ्रान्सिस क्रिक इन्स्टिट्यूट अँड युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन येथील संशोधकांच्या गटानं इन्फ्लेमेटरी बॉवेल डिसिज या आजाराचं कारण शोधण्याचा प्रयत्न करताना सखोल जनुकीय किंवा आनुवंशिक विश्लेषण केलं.

यातून त्यांना आढळलं की, डीएनएचा एक भाग इन्फ्लेमेशन नियंत्रित करणारा मॅक्रोफेजेसचा मुख्य घटक असतो. तो पिरॅमिडच्या सर्वात वर असतो, असं फ्रान्सिस क्रिक इन्स्टिट्यूटचे डॉ. जेम्स ली म्हणतात. इन्फ्लेमेशनसाठी कारणीभूत असणारी रसायनं जी मायक्रोफेजेसकडून स्त्रवत असतात त्याचं नियंत्रण हा जीन किंवा जनुक करतो. काही लोकांमध्ये जन्मतःच हे जनुक असतं, ज्यामुळे त्यांच्या शरीराची प्रवृत्ती हा आजार होण्याची असते. इन्फ्लेमेटरी बॉवेलसाठी कारणीभूत असलेल्या महत्त्वाच्या पेशींपैकी एका पेशीमध्ये दोष निर्माण होतो. नेचर या मासिकात विस्तारानं दिलेल्या माहितीनुसार पुढील प्रयोगांमधून दिसून आलं आहे की, कॅन्सर सारख्या इतर आजारांसाठी आधीच मंजुरी मिळालेल्या काही औषधांमुळे या आजारावर नियंत्रण मिळवता येतं.

## सर्वात प्राचीन काष्ठ कलाकृती

जगातील सर्वात प्राचीन लाकडी कलाकृती रशियात असून, तिचे नाव शिगीर आयडॉल असे आहे. या कलाकृतीमध्ये एक रहस्यमय चेहरा आहे. एके काळी ही कलाकृती सतरा फूट उंचीची होती. लार्च वृक्षाच्या खोडापासून ही कलाकृती बनवलेली आहे. ही कलाकृती सध्या एका म्युझियममध्ये ठेवण्यात आली आहे. रशियाच्या उरल पर्वतामध्ये ही कलाकृती सन १८९४ मध्ये सापडली होती. ती तब्बल १२,१०० वर्षांपूर्वीची आहे.



ज्यावेळी ही कलाकृती बनवली गेली त्यावेळी तिची उंची १७.४ फूट असावी, असे संशोधकांना वाटते. या कलाकृतीवर झिगझॅग पॅटर्नही कोरलेला आहे. तसेच अनेक मानवी चेहरे आणि हातही कोरलेले आहेत. २.६ दशलक्ष ते ११,७०० वर्षांपूर्वीच्या शिकाऱ्यांच्या समूहाने ही कलाकृती बनवली असावी, असे संशोधकांना वाटते. या काळाला प्लेस्टोसिन इपोक असे म्हटले जाते. याबाबतच्या संशोधनाची माहिती क्वाटर्नरी इंटरनॅशनल या नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या कलाकृतीवरील अनेक खुणा या तुर्कीच्या निओलिथिक आर्किओलॉजिकल साईट असलेल्या गोबेकली तेपे येथे सापडलेल्या दगडी कलाकृतीवरही आहेत. शेवटच्या हिमयुगाच्या शेवटी एकाच मानव समूहाने या कलाकृती बनवल्या असाव्यात, असे संशोधकांना वाटते. मात्र, या लाकडी कलाकृतीचे प्रयोजन काय असावे, याचा उलगडा

## बनी चाओ : आफ्रिकन भारतीयांची लाडकी

आपल्या देशातून वेगवेगळ्या कारणांसाठी काही लोक अन्य देशांमध्ये स्थलांतरित झालेले आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या किनारपट्टीवरच्या डरबन शहरात मोठ्या संख्येने भारतीय राहतात. आणि त्यांच्या संस्कृतीचा एक भाग बनलेली बनी चाओ नावाची एक डिश इथं मिळते. पण, कमाल म्हणजे ही डिश भारतातच मिळत नाही. अनेक वर्षांपूर्वी बरेच भारतीय आफ्रिकेत उसाच्या मळ्यात काम करायला स्थलांतरित झाले होते. त्यांच्यासोबतच बनी चाओ तिथं गेला, पण भारतात याबद्दल कुणालाही कल्पना नाही.



बनी चाओ म्हणजे करी भरलेला ब्रेडचा तुकडा. बनी चाओ भारतात मिळणार नाही याचे कारण ती बनवण्याची पद्धतच खास दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची आहे. लोक याला बनी चाओ म्हणत असले, तरी यात सशाचं मांस नसतं. हा पदार्थ मटणापासून बनवतात. ब्रेडच्या वाडग्यातच ही करी होते. म्हणून बनी चाओ खायला सुटसुटीत असतं. बनी चाओबरोबर गाजराचं सॅलड देतात. यामुळंच डरबनमधील शेतमजुरांमध्ये आणि कामगारांमध्ये बनी चाओ स्ट्रीट फूड म्हणून लोकप्रिय आहे.

बनी चाओ कसं खायचं, हे ज्याच्या-त्याच्या मर्जीवर अवलंबून असतं. याला चमचा वापरून देखील खाता येतं, असंही काही लोक म्हणतात. बनी चाओ हातानं खाल्ल्यास ब्रेडमधली करी पूर्णपणे खाता येते. पण, चमचा वापरून खायचा प्रयत्न केल्यास करी पूर्णपणे खाता येत नाही, असे जाणकार सांगतात. बनी चाओ डरबनमधला भारतीयांचा पारंपरिक खाद्यपदार्थ आहे; पण भारतात मात्र तो मिळत नाही!

## कमाई...तासाला ११६ कोटी!

जगातील श्रीमंत व्यक्तींची यादी दरवर्षी जाहीर केली जाते. या यादीनुसार गेल्या चार वर्षांत श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीत रॉकेटच्या वेगाने वाढ झाली आहे. अमेरिकेतल्या ऑक्सफॅम इंटरनॅशनल संस्थेने दिलेल्या अहवालानुसार २०२० पासून आतापर्यंत जगातील पाच अब्जाधीशांच्या संपत्तीत तब्बल ११४ टक्के वाढ झाली आहे. २०२० नंतर जगाने खूप चढ-उतार पाहिले. कोव्हिड महामारीपासून युक्रेन-रशिया युद्ध, इस्त्रायल-हमास युद्ध, या घटनांनी जगाच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला.



अनेक लोकांच्या नोकऱ्या गेल्या. जी काही बचत केली होती, ती संपली. मोठमोठ्या कंपन्या बंद झाल्या. याचा परिणाम असा झाला, गरीब आणखी गरीब झाले, तर श्रीमंत गडगंज श्रीमंत झाले. २०२० पासून आतापर्यंत जगातील पाच श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीत मात्र प्रचंड वाढ झाली. रोज आठ कोटी रुपये खर्च केले, तरी त्यांचे पैसे संपण्यासाठी पाचशे वर्षे लागतील! ऑक्सफॅम इंटरनॅशनल संस्थेच्या अहवालानुसार ज्या अब्जाधीशांची संपत्ती वाढली आहे, त्यात एलन मस्क, बर्नाड अनॉल्ट, जेफ बेजोस, लॅरी एलिसन आणि मार्क झुकेरबर्ग या उद्योगपतींचा समावेश आहे. या अब्जाधीशांची संपत्ती तब्बल ११४ टक्क्यांनी वाढली आहे. ऑक्सफॅम इंटरनॅशनल संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, या पाच उद्योगपतींची संपत्ती २०२० नंतर ४०५ अब्ज अमेरिकी डॉलरवरून ८६९ अब्ज अमेरिकी डॉलर म्हणजे भारतीय रुपयांत ७२ लाख करोड रुपये, इतकी वाढली आहे.

हे अब्जाधीश प्रत्येक तासाला ११६ कोटी रुपयांहून अधिकची कमाई करताहेत. श्रीमंतांच्या संपत्तीच्या वाढीचा वेग असाच राहिला, तर पुढच्या १० वर्षांत जगात खरबपती तयार होतील. जगातील १४८ कंपन्यांनी १८०० अब्ज अमेरिकी डॉलरचा नफा कमावला. जगातील सर्वात श्रीमंत असलेल्या १ टक्का लोकांकडे तब्बल ४३ टक्के संपत्ती आहे.

## आक्रोड कसे खावेत?

शरीराला योग्य प्रमाणात पोषक तत्त्वे मिळावीत, यासाठी वेगवेगळे पदार्थ खाल्ले जातात. अनेकजण रोजच्या आहारात सुकामेवा देखील खाताना दिसतात. सुकामेवा खाल्ल्यामुळे पोषक तत्त्वे मिळतात. त्यामध्ये अक्रोडचा देखील समावेश असतो. पण, हे अक्रोड पाण्यात भिजवून खावेत की तसेच खावेत, असा प्रश्न अनेकांना पडतो. तज्ज्ञांच्या मते बदामाप्रमाणेच अक्रोडही भिजवून खाल्ल्याने अधिक लाभ मिळतो.

अक्रोडमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते. याशिवाय अक्रोडमध्ये लोह, फॉस्फरस, तांबे, प्रथिने, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम आणि सेलेनिअम यांसारख्या पोषक तत्त्वांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होतो. त्यामुळे अक्रोड



खाल्ल्याने शरीराला योग्य ती जीवनसत्त्वे मिळतात. उन्हाळ्यात भिजवलेले अक्रोड खाणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. अक्रोड भिजवल्यामुळे त्यामधील उष्णता कमी होते. त्यामुळे अक्रोड खाण्यापूर्वी रात्रभर पाण्यात भिजत टाकवेत. असे केल्यामुळे त्यामधील उष्णता कमी होते आणि पौष्टिक घटक वाढतात. मात्र, हिवाळ्यात अक्रोड खाताने भिजत घालू नयेत. ते तसेच खावेत. जास्त अक्रोड खाल्ल्याने शरीराला त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे दिवसभरात केवळ २ ते ३ अक्रोड खावेत.

लहान मुलांना केवळ एक अक्रोड दिवसभरात खायला द्यावा; पण दररोज अक्रोड खाल्ल्याने शरीराला फायदा होतो. अक्रोड हे अँटिऑक्सिडंटस्ने युक्त आहेत. हे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी आणि हृदय निरोगी ठेवण्यासाठी उपयुक्त आहेत. अक्रोडला कॅलरीयुक्त खाद्यपदार्थ देखील मानले जाते, ज्यामुळे त्याचे कमी प्रमाणात सेवन केल्याने देखील भरपूर ऊर्जा मिळते. यामुळे छातीतील जळजळ कमी होते. अक्रोडातील फायबरमुळे पचनक्रिया सुरळीत राहते. त्यामुळे वाढते वजन कमी होण्यास मदत होते. याचे सेवन केल्याने पोट बराच काळ भरलेले राहते. त्यामुळे वजन नियंत्रणात राहते. रोज अक्रोड खाल्ल्याने मेंदू तीक्ष्ण होतो. अक्रोड खाल्ल्याने स्मरणशक्ती वाढते.

## चक्क घटस्फोटाचे मंदिर!

जगात अशा भरपूर जागा आहेत, ज्या आपल्या अनोख्या कथांमुळे आणि इतिहासामुळे प्रसिद्ध आहेत. भारतात अशा बऱ्याच जागा पाहायला मिळतील. मात्र, जगातही अशा अनेक जागा आहेत, ज्या सगळ्यांनाच चकित करतात. आज आम्ही तुम्हाला अशाच एका मंदिराबद्दल सांगणार आहोत, ज्याबद्दल जाणून तुम्ही थक्क व्हाल. जपानमधील हे मंदिर डिव्होर्स टेम्पल म्हणजेच घटस्फोटाचं मंदिर म्हणून ओळखलं जातं. जपानमध्ये असलेल्या या मंदिराचं नाव मात्सुगाओका टोकेई-जी आहे. खरंतर, १२व्या आणि १३व्या शतकात जपानी समाजात घटस्फोटाच्या तरतुदी फक्त पुरुषांसाठीच होत्या. त्या काळात पुरुष आपल्या बायकोला अगदी सहज घटस्फोट देऊ शकत होते. पण, कौटुंबिक हिंसाचार किंवा अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांसाठी या मंदिराचे दरवाजे उघडले गेले.



डिव्होर्स टेम्पल नक्कीच थोडं विचित्र वाटतं; पण त्यामागेही एक कथा आहे. लोकांच्या म्हणण्यानुसार, टोकई-जीचा इतिहास सुमारे ६०० वर्ष जुना आहे. हे मंदिर जपानच्या कामाकुरा शहरात आहे. हे मंदिर घरगुती हिंसाचाराच्या बळी ठरलेल्या महिलांचे घर मानले जाते. असं म्हणतात, की शतकानुशतके स्त्रिया आपल्यावर अत्याचार करणाऱ्या पतीपासून मुक्त होण्यासाठी या मंदिराचा आश्रय घेत असत. हे मंदिर काकुसान-नी नावाच्या ननने तिचा पती होजो टोकिमून यांच्या स्मरणार्थ बांधलं होतं.

ती आपल्या पतीसोबत खूश नव्हती आणि तिच्याकडे घटस्फोट घेण्याचा कोणताही मार्ग नव्हता. जपानमधील कामकुरा युगात महिलांचे पती कोणतंही कारण न देता लग्न मोडू शकत होते. त्यासाठी त्यांना साडेतीन ओळींची नोटीस लिहावी लागायची; तर काही लोकांच्या मते सुमारे तीन वर्षे या मंदिरात राहिल्यानंतर महिला आपल्या पतीशी संबंध तोडू शकत होत्या. नंतर ते दोन वर्षांपर्यंत कमी करण्यात आलं. सन १९०२ पर्यंत मंदिरात पुरुषांना सक्त मनाई होती. पण, त्यानंतर १९०२ मध्ये जेव्हा एन्गाकू-जी यांनी या मंदिराची जबाबदारी घेतली, तेव्हा त्यांनी एक पुरुष मठाधिपती नेमला.

## नाना काटे यांचे मुख्यमंत्र्यांना निवदेन

# शहरातील सेवा रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चिंचवड: :** चिंचवड मतदार संघातून जाणाऱ्या मुंबई- बंगळुरू महामार्गालगतच्या सेवा रस्त्याची दुरावस्था झाली आहे. याकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष झाल्याने रावेत, पुनावळे, ताथवडे, वाकड येथील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. किवळे ते वाकडपर्यंत असणाऱ्या या सेवा रस्त्यावर सध्या वाहन चालवणे अवघड झाले आहे. अक्षरश: खड्ड्यांमध्ये रस्ता शोधावा लागत आहे.

वाकड परिसरातील सेवा रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. येथील सेवा रस्त्याचे डांबरीकरण करावे, हा रस्ता चांगला करावा, अशी मागणी वारंवार केलेली आहे. मात्र हा सबवे व रस्ता राज्य शासन, केंद्रीय रस्ते मंत्रालय यांच्या कार्यक्षेत्रात येत असून, महापालिका येथे काही काम करण्यास हतबल आहे. त्यामुळे सबवे व सर्व्हिस रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात याव्या व नागरिकांना वाहतुकीच्या त्रासातून मुक्त करावे अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी सांगवी परिसरामध्ये स्थलांतरित नागरिकांची भेट घेत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी मुख्यमंत्र्यांची भेट घेत काटे यांनी त्यांना निवेदन दिले.

या निवेदनात काटे यांनी म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहर झपाट्याने वाढत आहे. चिंचवड मतदार संघात येणारा ताथवडे, पुनावळे, रावेत, वाकड परिसराची देखील झपाट्याने वाढ झाली आहे. या परिसरात अनेक आयटी कंपन्या व मोठ्या रहिवासी सोसायटी आहेत. त्यातच हा परिसर हिंजवडी आयटी पार्कला लागून असल्याने नागरिक या परिसरात वास्तव्यास पसंती देत असून येथे नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. त्यातच पुनावळे, ताथवडे, वाकड येथील सब वे अरुंद असून त्यात खड्डे पडलेले आहेत. तसेच या मुंबई बेंगलोर हायवे लगत असणारा सर्व्हिस रस्ता देखील खड्डेमय झाला आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, आयटी, व औद्योगिक कामगार वर्ग, महिला, जेष्ठ नागरिक यांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. महत्वाचे म्हणजे वाहतूक कोंडीत अनेक रुग्णवाहिका अडकतात अशा वेळी मोठा अनर्थ होण्याची शक्यता असते. या त्रासामुळे परिसरातील अनेक कंपन्या व रहिवासी स्थलांतर करीत आहे हि खूप खेददायक बाब आहे.

चिंचवड मतदार संघातून जाणारा मुंबई- बंगळुरू महामार्ग आणि सेवा रस्ता हा राज्य शासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत येतो. येथील सेवा रस्त्याचे डांबरीकरण करावे, हा रस्ता चांगला करावा, अशी मागणी वारंवार केलेली आहे. मात्र, या मागणीकडे दुर्लक्ष होत आहे.

याचा फटका ताथवडे, पुनावळे आणि वाकड भागांतील नागरिकांना बसत आहे. सुटीच्या दिवशी व आठवड्याच्या सुरुवातीला या रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागतात. हा सबवे व रस्ता राज्य शासन व केंद्रीय रस्ते मंत्रालय यांच्या कार्यक्षेत्रात येत असून, महापालिका येथे काही काम करण्यास हतबल आहे, त्यामुळे आपणच या रस्त्याच्या कामाबाबत तातडीने सूचना द्याव्यात जेणेकरून नागरिकांचा त्रास संपेल असे देखील नाना काटे यांनी म्हटले आहे.

## पीएमआरडीएचा कारभार आता मराठीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेनंतर आता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानेदेखील प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व विभागप्रमुखांनी आपले कामकाज मराठीतूनच करण्याच्या सूचना आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले आहेत. राज्य शासनाच्या परिपत्रकान्वये सामान्य नागरिकांशी केला जाणारा पत्रव्यवहार, सर्व नमुने, पत्रके, परवाने, टिप्पणी, आदेश, परिपत्रके, अहवाल आदी कार्यवृत्तांत मराठी भाषेत असणे आवश्यक आहे. त्याची अंमलबजावणी करण्याच्या सूचना महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी सर्व विभागप्रमुखांना दिल्या आहेत.

अधिकारी व कर्मचारी यांनी मराठीचा यथायोग्य वापर करावा. मराठी वापराबाबतच्या सूचनांचे सर्वांनी यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

## » Selected

## मणलाल लुंकड यांना उद्योग भूषण पुरस्कार प्रदान



**पिंपरी :** पुण्यातील अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्टच्या वतीने सामाजिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी रमणलाल लुंकड यांना उद्योग भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. लुंकड यांनी नाशिक येथील सामन गाव येथे मातोश्री वृद्धाश्रमास स्वखर्चाने एका इमारतीचे बांधकाम केले असून मन आणि घर हरविलेल्या मनोरुग्णांसाठी कार्य करणाऱ्या अहमदनगर येथील अमृतवाहिनी ग्राम विकास मंडळाला स्वखर्चाने एक इमारत बांधून दिली.
गणेश कला क्रीडा मंदिर पुणे येथे झालेल्या या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार माधुरी मिसाळ, प्रख्यात तबला वादक पदमश्री पं. सुरेश तळवळकर, पद्मश्री पं. विजय घाटे, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी उपस्थित होते.

## रुपीनगरमध्ये वीजवाहिनी काम सुरू



**मावळ :** पिंपरी-चिंचवडसह मावळ परिसरात झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे रुपीनगर येथील रुपी हौसिंग सोसायटी व परिसरात गेल्या 8 दिवसांपासून वीज नाही. मात्र, आता स्थानिक नागरिक व सोसायटीधारकांना सहन करावा लागणारा 'अंधकार संपला' आहे. या भागात महावितरण प्रशासनाकडून नवीन मुख्य वीजवाहिनी टाकण्याचे काम सुरू झाले आहे.

रुपीनगर येथील रुपी हौसिंग सोसायटीमध्ये मुख्य वीजवाहिनी खराब झाली होती. त्यामुळे गेल्या ८ दिवसांपासून वीजपुरवठा खंडीत झाला होता. दरम्यान, महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करुन केबलला तात्पुरता जॉईंट करण्यात आला. मात्र, वीज समस्या पुन्हा उद्भवली होती.

## मोकाच्या गुन्ह्यातील आरोपी महिलेला अटक

**पिंपरी:** मोकाच्या गुन्ह्यात मागील वर्षभरापासून पसार असलेल्या महिला आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले. ती स्वतःहून न्यायालयात हजर झाली. त्यानंतर तिला पोलिसांनी ताब्यात घेतले.न्यायालयाने तिला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सहायक पोलीस आयुक्त देविदास घेवारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, चिखली येथे मे २०२३ मध्ये झालेल्या सोन्या तापकीर खून प्रकरणातील मुख्य सूत्रधार असलेल्या करण रतन रोकडे हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्या टोळीतील त्याचा भाऊ ऋत्विक उर्फ मुंग्या रतन रोकडे आणि आई लता रतन रोकडे यांच्यासह टोळीतील इतर साथीदारांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी जुलै २०२३ मध्ये 'मोकां'तर्गत कारवाई केली होती. तेव्हापासून लता रोकडे परागंदा होती. दरम्यान, तिने अटक पूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने अर्ज फेटाळला. अखेर आरोपी महिला स्वतःहून न्यायालयात हजर झाली असता पोलिसांनी तिला १ ऑगस्ट रोजी ताब्यात घेतले.

## तिकोणाचा भाग कोसळला

**पवनानगर:** काही दिवसांपूर्वी किल्ले लोहगडाच्या पायथ्याशी



डोंगराला भेगा पडल्याचे प्रकरण ताजे असतानाच, पवन मावळातील आणखीन एक किल्ला तिकोणा गडावरील काही भाग कोसळला आहे. अचानक घडलेल्या या घटनेने गडाखालच्या गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रविवारी गडावरील श्रीरामाची गादी येथील काही भागात भूस्खलन झाल्याने तेथील दगड-गोटे, माती खाली आले आहेत. मावळात सध्या पावसाचा जोर वाढला आहे. त्यात ग्रामीण भागात पावसाचा जोर अधिक असून यादरम्यान घाटमाथ्यावर दरडी कोसळण्याची शक्यता आहे. रविवारी दुपारी पाउणेबाराच्या सुमारास तिकोणा उर्फ वितंगगड किल्ल्याचा काही भाग कोसळला.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## वर्षा पर्यटनासाठी मावळात पर्यटकांची गर्दी

**मावळ :** मागील काही वर्षांपासून पवना धरण आणि परिसराला पर्यटकांची पसंती मिळत आहे. पवन मावळ हे राज्यभरातील पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. प्रत्येक विकेंडला पावसाळी पर्यटनासाठी पर्यटकांची मोठी गर्दी पवन मावळ परिसरात होताना दिसत आहे.
मावळ तालुक्यातील बारमाही पर्यटनस्थळ असलेले लोणावळा, खंडाळा यांच्यासोबतच पवनमावळ परिसर आता पर्यटकांना खुणावू लागला आहे. पवना धरण, लोहगड किल्ला, किल्ले विसापूर, तुंग, तिकोणा हे गड, तसेच प्रतिपंढरपूरसह विविध धार्मिक ठिकाणे, बेडसे लेणी, धरणाजवळील कॅम्पिंग यांसोबत कृषी पर्यटन यामुळे प्रत्येक विकेंडला पर्यटकांची पाऊले अपोआप पवनमावळाकडे वळतात.

**पर्यटकांना आवडे आंबेगावचा डोंगर –**
पवना धरण येथून किल्ले लोहगडाकडे जाताना मार्गावर आंबेगाव या गावाजवळील डोंगरावर असणारे लहान-मोठे धबधबे पर्यटकांना मोहीत करतात.
कुटुंबालीसोबत मौजमस्ती करण्यासाठी आणि पावसाळी पर्यटनासाठी हे ठिकाणी सुरक्षित आणि सोइस्कर आहे. या डोंगरावरील रस्त्यालगतचे लहान मोठे धबधब्यांमुळे पर्यटकांची मोठी गर्दी येथे होते. मात्र पर्यटकांकडून रस्त्यावर वाहने पार्क केली जात असल्याने त्याचा त्रास स्थानिक आणि इतर वाहनचालकांना होतो.



## पूरग्रस्तांची आरोग्य तपासणी...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागामार्फत पूरग्रस्त भागातील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे.

### आजारी नागरिकांना घरपोच औषधोपचार

# पूरग्रस्त नागरिकांची आरोग्य तपासणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पूर परिस्थितीमुळे ज्या ज्या ठिकाणावरून नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले होते. त्या सर्व घरांमध्ये वैद्यकीय विभागामार्फत एम.पी.डब्ल्यु, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविका यांचेमार्फत घरोघरी जाऊन जलजन्य व किटकजन्य आजारांबाबत सर्वेक्षण, जनजागृती व आजारी नागरिकांना औषधोपचार पुरविण्यात येत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये झालेल्या अतिवृष्टी मुळे नद्यांना पुर आल्याने नदीकाठच्या व पुरबाधित नागरिकांना शाळांमध्ये स्थलांतरित करण्यात आलेले आहे. सदर नागरिकांची आरोग्य तपासणीसाठी वैद्यकिय विभागाने रुग्णालय झोन निहाय १६ पथके तयार केली आहेत. या पथकांमार्फत या नागरिकांची आरोग्य तपासणी करुन लक्षणानुसार औषधोपचार करण्यात येत आहेत. पूर परिस्थितीमुळे ज्या ज्या ठिकाणावरून नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले होते.

त्या सर्व घरांमध्ये वैद्यकीय विभागामार्फत एम.पी. डब्ल्यु, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविका यांचेमार्फत आजारी नागरिकांना घरपोच औषधोपचार पुरविण्यात येत आहेत.

### परीसरात साफसफाई ठेवण्याचे आवाहन

# पूर ओसरल्यानंतर महापालिकेच्या वतीने विविध भागात स्वच्छता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** अतिवृष्टीमुळे आणि नदीपात्रात पाण्याची वाढ झाल्याने पुरग्रस्त तसेच सखल भागात पाणी साचले होते. हे पाणी ओसरल्यानंतर आयुक्त शेखर सिंह यांनी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पूरबाधित परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार आज पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पूरबाधित परिसरांमधील पाणी ओसरल्यानंतर शहरातील विविध भागात तसेच नदीकाठच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

शहरातील विविध ठिकाणी साठलेले पाणी निवळल्यानंतर महापालिका पथकाच्या वतीने शहरातील विविध भागात रस्त्यावरील चिखल साफ करणे, तुंबलेल्या चेंबर्सची स्वच्छता करणे, नदीकाठी जमा झालेल्या कचरा तसेच गाळ जेसीबीच्या सहाय्याने हटविणे, माती साचलेल्या ठिकाणी पाणी फवारणी करून स्वच्छता करणे, विविध ठिकाणी तसेच पुरबाधित भागात निर्जंतुकीकरण करणे तसेच निवारा केंद्रांमध्ये भोजन आणि आदी व्यवस्था करणे, चिखलाने माखलेला परिसर पाण्याच्या फवाऱ्याने स्वच्छ करणे, नदीकाठच्या परिसरात अडकलेला कचरा व पाने-वेली हटविणे अशी विविध कामे तातडीने करण्यात येत असून संध्याकाळी उशिरापर्यंत ही कामे सुरु आहेत. यामध्ये प्रामुख्याने शहरातील डुडुळगाव स्मशानभूमी, बोपखेल रामनगर, बोपखेल स्मशानभूमी, गव्हाणे घाट पिंपळे निलख गावठाण, दत्त मंदिर घाट पिंपळे सौदागर, संजय गांधी नगर, पिंपरी वाघेरे तसेच शहरातील नदीकाठी घाट परिसर, स्मशानभूमी आदी परिसरांचा समावेश आहे.

या व्यतिरिक्त, पूरग्रस्त भागात महापालिकेच्या वतीने वैद्यकीय सेवा पुरविल्या जात आहेत. त्यामध्ये नागरिकांना विविध औषधोपचार पुरविणे, पावसामुळे सर्दी, खोकला, ताप इतर आजाराने ग्रस्त नागरिकांचा रक्त नमुना तपासून त्यांच्यावर योग्य औषधोपचार करणे अशा वैद्यकीय सुविधा तत्परतेने पुरविल्या जात आहेत. तसेच महापालिकेच्या विविध निवारा केंद्रांमध्ये वैद्यकीत पथके तैनात असून पूरग्रस्त रहिवाशांची आरोग्य तपासणी तसेच आवश्यक औषधोपचार करण्यात येत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे पिण्याच्या पाण्यातून जलजन्य रोगांचा प्रसार होण्याची दाट शक्यता असते. दक्षतेचा उपाय म्हणून नागरिकांनी इमारतीवरील पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करुन घ्यावी व पाण्याच्या टाकी सभोवतालची जागा स्वच्छ ठेवावी.

## भाजप कायदा आघाडीचा सन्मान सोहळा उत्साहात

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** कायदा आघाडी' ही कोणत्याही राजकीय पक्षासाठी निर्णायक बाब आहे. संकटकाळात राजकीय पक्षाचं आस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी गुणी आणि ज्ञानी वकिलांची विचारसरणी मोलाची ठरते. भारतीय जनता पक्षाकडे गुणवंत वकिलांची मोठी फळी असल्यामुळेच भारताच्या संविधानिक कसोटीवर आज आपला पक्ष सर्वश्रेष्ठ पक्ष म्हणून गणला जातो. याच श्रेय निश्चितच भाजपाच्या कायदा आघाडीला जाते, असे प्रतिपादन भाजपा कायदा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अॅड. उदय डबले यांनी केलं.

शहर भाजपा कायदा आघाडीच्या वतीने जिल्हा अध्यक्ष तथा निमंत्रक अॅड. गोरखनाथ झोळ यांच्या नेतृत्वाखाली नवनियुक्त लोकप्रतिनिधी, वकील बांधव, दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.
यावेळी कायदा आघाडीच्या संपर्क प्रमुखपदी अॅड. एस. बी. चांडक, प्रचार प्रमुखपदी अॅड. सुभाष चिंचवडे, राष्ट्रीय उपाध्यक्षपदी अॅड. व्हिक्टर पिंटो यांच्यासह कार्यकारिणीत नवीन वकिलांच्या निवड नियुक्त्या करण्यात आल्या.

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची महापालिकेकडे मागणी

# शहराला दररोज पाणीपुरवठा करा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करण्यात येणा-या पवना धरण परिसरात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे दररोज पाणीपुरवठा करण्याची मागणी केली जात आहे. या पावसामुळे धरण सध्यस्थितीत ९३टक्के भरले आहे. धरण दरवर्षीप्रमाणे यंदा लवकरच भरले आहे. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्गही सुरू करण्यात आला आहे. तसेच गेल्या साडेचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे.

धरणात मुबलक पाणी असताना शहरवासीयांना दररोज पाणी पुरवठा करून दिलासा द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष मयूर जाधव यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे केली आहे.

मावळ तालुका परीसरात जोरदार पाऊस सुरू आहे. मावळात पाच तासात १५० मिमी पाऊस पडला आहे. तर २४ तासात २३२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पवना धरणाच्या सांडव्यावरून ५६७० क्युसेक् पाणी सोडले आहे. जलविद्युत केंद्रामधून विदुयतगृहाद्वारे १४०० असा एकुण ७०७० क्युसेक इतक्या क्षमतेने नदीपात्रात विसर्ग चालू आहे. पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढलेला असल्याने पाणीसाठा नियंत्रित करणेकरिता दुपारी १२ वाजता व सांडव्यावरून विसर्ग वाढवला आहे. एकुण ८९६० कयुसेक इतक्या क्षमतेने विसर्ग होणार आहे.

#रा

## सेट परीक्षेचा बहुप्रतिक्षित निकाल जाहीर



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे घेण्यात आलेल्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठीच्या पात्रता परीक्षेचा (सेट) निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत ७ हजार २७३ उमेदवार पात्र ठरले असून, पात्र ठरलेल्यांची टक्केवारी ६.६६ आहे.विद्यापीठाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी सेट परीक्षा घेतली जाते. त्यानुसार ३९वी सेट परीक्षा ७ एप्रिल रोजी १७ शहरांमधील केंद्रांवर घेण्यात आली. एकूण एक लाख ९ हजार २५० उमेदवारांनी ही परीक्षा दिली. मात्र या परीक्षेला एसईबीसी आरक्षण लागू करण्याची मागणी करण्यात आल्याने त्याबाबतची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यात निकाल जाहीर करण्यास विलंब झाला. विद्यापीठाच्या https://setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. या परीक्षेची अंतिम उत्तरतालिका विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना विद्यार्थ्यांना त्यांचे प्रमाणपत्र संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले.

### खड्डे बुजविण्यास मर्यादा; पथ विभागाची चांगलीच गोची

# निकृष्ठ दर्जाच्या कामाचे पितळ उघडे

**पुणे :** शहराला गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. पावसामुळे पथ विभागाच्या निष्कृष्ट दर्जाच्या कामाचे पितळ उघडे पडले आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यावर पुणेकरांकडून संताप व्यक्त केला जाऊ लागला आहे. त्यामुळे पुणे महापालिकेच्या पथ विभागाने मोठा गाजावाजा करत खड्डे बुजविण्याची जणू स्पर्धाच सुरू केली होती. परंतु हॉटमिक्स प्लॉटवरील खडीमध्ये ओलावा असल्याने खड्डे बुजविण्यास मर्यादा येत असल्याचे कारण देत पथ विभागाची चांगलीच गोची झाली आहे. त्यामुळे मध्येच ही स्पर्धा लांबणीवर टाकण्याची नामुष्की महापालिकेच्या पथ विभागावर आली आहे.

रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांवर बाबत नागरिकांनी तक्रार केल्यानंतर भर पावसात खड्डे बुजवता येत नाहीत, असे कारण एरवी पथ विभागाकडून दिले जाते. मात्र, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी निर्देश दिल्यानंतर महापालिका खड्डे बुजवण्याच्या कामासाठी खाडकन जागी झाली. त्यानंतर भर पावसात आणि रस्त्यावर पाणी वाहात असताना रस्त्यावर डांबर टाकले जात होते. तसेच पॅचवर्कदेखील करण्यात आले आहे. भर पावसात केलेले काम कितपत टिकाव धरेल, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जाऊ लागला होता. परंतु पथ विभागानेच या सलग पावसाच्या कालावधीत केवळ कोल्ड मिक्स मालाद्वारे खड्डे बुजविण्यात येत असल्यामुळे सदर कामास मर्यादा येत असल्याचे मान्य केले.

तसेच सद्यस्थितीत सलगरित्या पाऊस पडत असल्याने महापालिकेच्या हॉटमिक्स प्लॉटवरती खडीमध्ये ओलावा असल्याने, गरम डांबरी मालाची निर्मिती होत नाही. त्यामुळे पावसाची उघडीप मिळाल्यानंतर दिवसपाळी व रात्रपाळी अशा दोन्ही टप्प्यांमध्ये शहरातील खड्डे तातडीने बुजविण्यात येतील, असे जाहीर केले आहे. भर पावसात केलेले काम आता कितपत टिकेल, की पुन्हा पुणेकरांचे कर पैसे वाया जातील याकडे लक्ष लागून राहिलेले आहे.





**कटबॅक इमल्शनचा वापर**

मुसळधार पावसाच्या वेळी ओल्या खडीमुळे व अन्य तांत्रिक कारणाने हॉटमिक्स प्लॉन्ट यंत्रणा ज्या वेळेला कार्यरत ठेवता येत नाही, त्यावेळेला कोल्ड मिक्स डांबरामार्फत रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात येत आहेत. आतापर्यंत ४ हजार ६९७ कोल्ड मिक्स बॅग खड्डे दुरुस्तीसाठी वापरण्यात आले आहेत. त्याचबरोबर कटबॅक इमल्शन वापरून पावसाळ्याच्या कालावधीत खड्डे दुरुस्ती केली आहे. रस्त्याच्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरिता स्वतंत्रपणे तज्ज्ञ समिती कार्यान्वित असून, त्यांच्या सूचनेनुसार नवीन पावसाळ्याच्या कालावधीत देखील खड्डे दुरुस्ती करता येईल, असे कटबॅक इमल्शनचा वापर सुरू करण्यात आलेला आहे.

महापालिकेच्या येरवडा येथे हॉट मिक्स प्लॉन्ट आहे. त्यामधील डांबरी मालामार्फत शहरातील महत्त्वाचे रस्ते तसेच चौक यामध्ये पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती दैनंदिन स्वरूपात करण्यात येत असते. मार्च २०२४ पासून महापालिकेने रस्त्यावर व चौकामध्ये मिळून एकूण ८ हजार ४७२ इतके खड्डे बुजविण्यात आले आहेत. रस्त्याच्या खराब भागावर पेव्हर मशनरीद्वारे डांबरीकरणासाठी व खड्डे दुरुस्तीकरिता २० हजार ४३१ मेट्रीक टन इतक्या डांबर मालाने काम करण्यात आलेले आहे. तसेच रस्त्यावरील खचलेले चेंबर्स २५२ ठिकाणी दुरुस्त करून रस्त्याच्या समपातळीत आणले आहेत. त्याचबरोबर महत्त्वाच्या रस्त्यावरील पावसाळ्याच्या कालावधीत साचलेल्या पाण्याचा निचरा ८६ ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत.

पाणी साचण्याची ठिकाणे आणि खड्डे दुरुस्ती याबाबत स्थानिक वाहतूक पोलिसांची समन्वय ठेवून काम करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे महत्त्वाच्या रस्त्यावर आवश्यकतेप्रमाणे पेव्हर ब्लॉक वापरूनदेखील खड्डे दुरुस्ती करण्यात येत आहे. पावसाळ्याच्या कालावधीत पीआर सोल्युशन, कोल्ड मिक्स बॅग या दोन्हींचा वापर करण्यात येत आहे. शहरातील मुख्य रस्त्यांपैकी पीएमआरडीएमार्फत गणेशखिंड रस्त्यावर आणि बाणेर रस्त्यावर मेट्रो प्रकल्प सुरू आहेत. या कामांमुळे मोठ्या प्रमाणात होत असलेल्या खोदाईमुळे तसेच अवजड क्रेनच्या वारंवार वाहतुकीमुळे रस्ते मोठ्या प्रमाणात खराब होत असल्याचीही वस्तुस्थिती समोर आली. त्याचबरोबर एमएसईबीमार्फत दुरुस्तीसाठी रस्त्यावर विविध ठिकाणी खोदाई होत आहे. त्याचबरोबर पुणे मनपाच्या समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत टाकण्यात येणाऱ्या पाण्याच्या लाईनमुळेही रस्ते खराब होत आहेत. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाला त्यांच्या हद्दीतील रस्त्यांची दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे पथ विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## अवतीभवती
CITY UPDATE


### पुणेकरांना सुरळीत वाहतुकीचा एक दिवसीय सुखद अनुभव

**पुणे :** शिवाजीनगरच्या पाटील इस्टेट, सिंहगड रस्त्यावरील एकतानगरी आणि सांगवी पूरग्रस्त भागातील बाधित नागरिकांच्या भेटीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवारी पुण्यात आले होते. यावेळी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यामुळे काही काळासाठी का होईना पुणेकरांना सुरळीत वाहतुकीचा सुखद अनुभव मात्र घेता आला. पावसाच्या उघडीपने पालिका प्रशासनाने खड्ड्यांचे 'ठिगळ काम' उरकून घेतले. एरवी वाहतूक कोंडीमुळे पुणेकरांचा जीव टांगणीला लागलेला असतो. चौकांमध्ये वाहतूक पोलिसांचा पत्ता नसतो. अशा स्थितीत मुख्यमंत्री पुण्यात येणार म्हटल्यावर शहरातील महत्त्वाच्या आणि त्यातही मुख्यमंत्री ज्या मार्गाने जाणार त्या रस्त्यावर वाहतूक पोलीस अवतरले. वाहनचालक त्यांना किती जुमानतात हे सर्वश्रुत असल्याने त्यांच्या जोडीला स्थानिक पोलीस ठाणे आणि मुख्यालयातील खाकी वर्दीमधील पोलिसांची कुमक देण्यात आली. त्यामुळे चौकाचौकात खाकी वर्दीमधले पोलीस दिसत होते.

### कुत्र्यावरून झालेला वाद थेट पोलिस स्टेशनपर्यंत पोहचला

**पुणे :** पुणे तिथे काय उणे असे नेहमीच म्हटले जाते. पुण्यामध्ये कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे राडे सुरूच आहेत. कधी शुल्लक कारणावरून, कधी बघण्यावरून, कधी पार्किंगवरून तर कधी धक्का लागल्यामुळे भांडणं होत असतात. ही भांडणे छोटी-मोठी नसतात तर थेट हाणामारीच होते. अशामध्ये आता पुण्यामध्ये कुत्र्यामुळे तुफान राडा झाला आहे. तुमचा कुत्रा आमच्या श्वानाला चावला, यावरून पुण्यात भल्यापहाटे दोन मालक एकमेकांमध्ये भिडले. यांच्या वादामुळे शेजारी राहणाऱ्यांना प्रचंड त्रास झाला. त्यामुळे या नागरिकांनी संताप व्यक्त केला.

### वारजे एन.डी.ए. रोड मैलापाणी, सांडपाणी लाईनचे काम सुरू



**वारजे :** एन.डी.ए. रोड मुख्य रस्त्यावरील मैलापाणी, सांडपाणी लाईन नव्याने टाकण्याचे काम सुरू झाले आहे. हे काम रात्रीचेच सुरु राहिल ज्याने वाहतुकीला अडथळा होणार नाही. यासाठी रस्त्यावर टप्प्याटप्प्याने खोदाई करुन ड्रेनेज लाईन टाकण्यात येत आहे. रात्री या कामांची पाहणी करण्यासाठी पुणे महापालिकेचे ड्रेनेज विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोंजारी, कार्यकारी अभियंता बेंद्रे आले होते. अखेर आपण केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. यामुळे वारजेच नव्हे तर शिवणे,उत्तमनगर,कोंढवे, कोपरे, येथील सर्वच नागरिकांना यामुळे दिलासा मिळाला. नागरिक या रस्त्यावरून वाहतूक करतात या सर्वांची रोजच्या होणाऱ्या मरणयातनेतुन सुटका होईल, ही अपेक्षा असल्याचे माजी नगरसेवक किरण बारटक्के यांनी सांगितले. प्रशासनाने अशीच तत्परता ठेऊन लवकरात लवकर शेवट पर्यंत काम पूर्ण करावे हीच नागरिकांची इच्छा आहे. मागील अनेक दिवसांपासून ड्रेनेजचे हे पाणी रस्त्यावरून वाहत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी निर्माण झाली होती.

## शहरात पूरग्रस्त महिलांचे आंदोलन

**पुणे :** पुण्यात पूरग्रस्त महिलांचा संताप पाहायला मिळत आहे. या महिला थेट रस्त्यावर उतरल्या आहेत. मुख्यमंत्री साहेबांचा निषेध असो, अशी जोरदार घोषणा देत महिला आक्रमक झाल्या आहेत. पुण्यात पूरग्रस्तस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी अनेकांचे संसार उघड्यावर आले. मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र फक्त एकता नगरमधील नागरिकांनाच सरकारने मदत केली आहे. आमच्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप पुलाची वाडी परिसरातील महिलांनी केला आहे.



**पुण्यातील पूरग्रस्त महिलांचा आक्रमक पवित्रा**

- आम्ही मुख्यमंत्र्यांच्या सावत्र बहिणी आहोत, असं म्हणत पुण्यातील पुलाची वाडी या परिसरातील महिला xयांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरच त्यांचा रोष व्यक्त केलाय. पुलाची वाडी या परिसरात मुसळधार पावसामुळे अनेक घरांमध्ये पाणी शिरले होते. या ठिकाणी तीन तरूणांचा दुर्दैवी मृत्यू देखील झाला होता. परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला भेट दिली नाही, असा आरोप या परिसरातील महिलांनी केला आहे.

**आम्ही मुख्यमंत्र्यांच्या सावत्र बहिणी...**

- मुख्यमंत्री पुण्यात येऊन याच रस्त्यावरून गेले, मात्र आमच्याकडे आले नाहीत. रात्री गाढ झोपेत असताना पाणी आलं आणि होत्याचं नव्हतं झाले, अशा अनेक संतप्त प्रतिक्रिया या महिलांनी व्यक्त केल्या आहेत. पुण्यातील पूरग्रस्त महिलांचा संताप समोर आला. यावेळी महिलांनी एकीकडे मुख्यमंत्र्यांनी लाडकी बहीण योजना सुरू केली, तर दुसरीकडे आमच्याकडे दुर्लक्ष केल्याचे या महिलांनी म्हटले आहे. आम्ही मुख्यमंत्र्यांच्या सावत्र बहिणी असा नारा देत निषेध व्यक्त केला.

### वेतनातून २५ हजार केले कपात

## अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्थेकडून शिक्षकांची फसवणूक

**कात्रज :** येथील अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्थेच्या संचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आली आहे. शिक्षकांच्या वेतनातून २५ हजार रुपये कपात केल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३५ वर्षीय शिक्षकाने त्यांच्याविरोधात भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

शासकीय अनुदानाची फाईल शिक्षण विभागाकडे पाठवयाची असेल तर प्रत्येकी पाच हजार रुपये तसेच त्यानंतर पुढे निवृत्त होईपर्यंत दरमहा पगाराच्या दहा टक्के रक्कम ही संस्थेस द्यावी लागेल, अशी मागणी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडे करणाऱ्या संस्थेच्या संचालकांवर खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये अंबरचंदजी मुनोत शिक्षण संस्था संचालित मुनोत प्राथमिक विद्यालय आणि स्व. झुंबरबाई मुनोत माध्यमिक विद्यालय या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक मुनोत, सचिव निखील मुनोत, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी हर्षदा मुनोत, माध्यमिक शाळा मुख्याध्यापिका सुरेखा सुतार आणि प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका उल्का नवगिरे यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.



मागील १० ते १२ वर्षांपासून शारीरिक, मानसिक आणि आर्थिक पिळवणूक आरोपींनी केल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या प्रकरणी ज्ञानोबा साधू सराटे (व्यवसाय - शिक्षक, रा. गणेश कॉलनी, कात्रज) यांनी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे. तपास भारती विद्यापीठ पोलिस करत आहेत.

### महा-आरोग्य शिबीराला चांगला प्रतिसाद : सनी निम्हण

## सुमारे सत्तर हजार रूग्णांना लाभ

**पुणे :** सोमेश्वर फाऊंडेशन तर्फे आयोजित माजी आमदार स्वर्गीय विनायक निम्हण यांच्या जयंती निमित्त शहरामध्ये तीन टप्यात, ३६ ठिकाणी 'कार्यसम्राट मोफत महा-आरोग्य शिबीर" घेण्यात आले. रविवारी घेण्यात आलेल्या शिबीरामध्ये ६८२४८ रुग्णांनी प्रत्यक्ष लाभ घेतला असून, पुढील महिनाभरात रूग्णांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रकिया देखील पूर्ण केल्या जाणार असल्याची माहिती आयोजक सनी निम्हण यांनी दिली.



- शस्त्रक्रियेसाठी नोंदणी झालेल्या रूग्णांवर पुढील दोन महिन्यात शस्त्रक्रिया केली जाईल

> जयंतीनिमित्त आयोजित केलेला कार्यक्रम हा आबांचा सामाजिक वारसा माझा वसा म्हणून पुढे घेऊन जात आहे. समाजाला देणं लागतो ही त्यांची शिकवण आहे. त्यानिमित्त हे आरोग्य शिबीर दरवर्षी आयोजित करत आहे. त्यामध्ये सहभागी असलेले महाराष्ट्र शासन, निमसरकारी अधिकारी , प्रशासकीय अधिकारी, रूग्णालय, डॉक्टर, पुणे महापालिका व सर्व माझे सहकारी व निम्हण कुटुंबीयांचे मी मनापासून आभार मानतो."
>
> **- सनी विनायक निम्हण,** आयोजक

शिबीरामध्ये आयुष विभाग ३५६०, दिव्यांग रुग्ण साहित्य व कृत्रीम अवयव नोंदणी ७००, सामान्य औषध ६५३३, हृदयविकार १५००, श्वसन विकार ६२०५, वृद्धत्व ६०२०, त्वचाविकार ६००८, मनोविकार ३५१, अनुवंशीक विकार २००, मेंदुविकार १२५१, कान नाक घासा ८२०५, नेत्रचिकीत्सा विभाग १००२१, सामान्य शस्त्रक्रिया ६००६, लठ्ठपणा ३५०, प्लास्टिक सर्जरी ७५०, मुत्रविकार ११००, कर्करोग ५५०, अस्थिव्यंगोपचार १००९, फिजीओथेरपी ७५२, बालविकार २०२२, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र २१५०, दंतचिकीत्सा ३००५ इत्यादी आजारावर रूग्णांनी प्रत्यक्ष उपचार घेतले. काल दिवसभर मुसळधार पाऊस असताना देखील नागरिक उपचारासाठी येत होते.

### बेवारस रुग्णासाठी ससूनचे पत्र

**पुणे :** ससून रुग्णालयातून नुकतेच एका बेवारस रुग्णाला मनोरुग्णालयाच्या समोर सोडून दिल्याचे प्रकरण उघडकीस आले होते. त्यामुळे रुग्णालयावर टीका झाली. मात्र, रुग्णालयाच्याही काही बाजू आहेत त्या देखील समजून घेणे आवश्यक आहे. अजूनही रुग्णालयात असे ४८ रुग्ण आहेत. त्यांचा भार येथील वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांच्यावर पडत आहे. हे सर्व ओझे ससूनवर पडत आहे. परंतु, असे अनेक रुग्ण आहेत ज्यांचा उपचार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच महापालिकेच्या सर्वसामान्य रुग्णालयांत आणि पिंपरी-चिंचवडच्या वायसीएम हॉस्पिटलमध्ये होणे शक्य आहे. मात्र, सर्वच रुग्ण बेधडकपणे ससूनमध्ये पाठविले जातात. त्यामुळे येथे पेशंटची संख्या वाढते. आम्ही किती भार सहन करायचा असा प्रश्न ससून रुग्णालयाकडून विचारला जात आहे.

### उद्योगपती सायरस पूनावाला यांच्याकडून दोनशे कोटी रुपयांचा निधी

## विद्यापीठात तारांकित 'कन्व्हेन्शन सेंटर'चा घाट

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात तारांकित कन्व्हेन्शन सेंटर, अतिथिगृह बांधण्याचा घाट घालण्यात येत आहे. ज्येष्ठ उद्योगपती सायरस पूनावाला यांच्याकडून त्यासाठी दोनशे कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे.या प्रकल्पाच्या प्रस्तावाला अद्याप मूर्त स्वरूप आलेले नाही. मात्र, या प्रकल्पाबाबत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेतच मतमतांतरे आहेत या प्रकल्पाबाबत बराच काळ चर्चा, सल्लामलसत सुरू आहे. विद्यापीठाची जागा शासकीय मालकीची असल्याने विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मंजुरी दिली, तरी राज्यपाल, राज्य शासनाकडून मान्यता मिळणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पाबाबत नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बरीच चर्चाही झाली.



> मूळ प्रस्ताव वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि वसतिगृहांसाठीच्या निधीचा होती. मात्र, त्यात बदल होऊन आता त्याचे रूपांतर तारांकित कन्व्हेन्शन सेंटर, अतिथिगृहात झाले आहे. त्यासाठी दहा हजार झाडे तोडावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यापीठात विद्यार्थ्यांना वसतिगृह न मिळण्यासारख्या मूलभूत समस्या सुटलेल्या नाहीत. त्यामुळे या प्रकल्पाला विरोध दर्शवला आहे."
>
> **— सागर वैद्य,** व्यवस्थापन परिषद सदस्य

व्यवस्थापन परिषद सदस्य रवींद्र शिंगणापूरकर म्हणाले, की कन्व्हेन्शन सेंटर दीर्घकालीन विचार करता विद्यापीठासाठी उपयुक्त ठरणार आहे. या निमित्ताने विद्यापीठ उद्योग क्षेत्राशी जोडले जाणार आहे. त्याचा सर्वांगीण फायदा विद्यापीठाला होऊ शकेल. तांत्रिक अडचणी उद्भवू नयेत याबाबतची काळजी घेतली जात आहे.

त्याशिवाय आणखी एका सदस्याने विरोध करणारे पत्र कुलगुरूंना दिले आहे. दरम्यान, प्रकल्पाबाबतची चर्चा प्राथमिक स्तरावर आहे. अद्याप काहीच अंतिम झाले नसल्याने त्यावर अधिक चर्चा करणे योग्य नाही, असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी सांगितले.

## चंद्रकांत पाटील यांचे नाव बोर्डावर नसल्याने

# भाजप,शिवसेना कार्यकर्त्यांनी नामफलक उखडला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली :** येवलेवस्ती (पेरणे) ते बकोरी व लोणीकंद ते डोंगरगाव या रस्त्याचे भूमिपूजन दि.१६ सप्टेंबर २०२३ रोजी माजी खासदार शिवाजीदादा आढळराव,भाजपा विधानसभा प्रमुख प्रदीप कंद व पै.संदीप भोंडवे, विपुल शितोळे,शामराव गावडे पेरणे गावचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या शुभहस्ते झाले होते.

हा निधी तत्कालिन पालकमंत्री चंद्रकांत पाटील व माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत वर्ग करण्यात आला होता.या रस्त्यांचे भूमिपूजन होऊन रस्त्याचे काम सुरू करण्यात आले असताना पुन्हा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आमदार अशोक पवार यांनी पुन्हा एकदा चुकीच्या पध्दतीने या रस्त्याचे भूमिपूजन केल्याची माहिती भाजपा क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य पै.संदीप भोंडवे यांनी दिली.

वास्तविक हा रस्ता तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या माध्यमातून आला असताना आमदार अशोक पवार यांनी आज या रस्त्याचे भूमिपूजन शुभारंभ करताना नामफलकावर जाणीवपूर्वक पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे नाव टाकले नाही म्हणुन हवेली तालुका भाजपा व शिवसेना(शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी निषेध व्यक्त करीत आज आमदार पवार यांनी भूमिपूजन केलेले नामफलक सन्मानपूर्वक बाजुला काढुन ठेवले वास्तविक बोर्डाला काळे फासणे बोर्डाचा विध्वंस करणे हा उद्देश ठेवून भाजपा व शिवसेनेचे पदाधिकारी तिथे पोचले होते परंतु बोर्डावर पालकमंत्री अजित पवार यांचे नाव असल्याने तो बोर्ड सन्मानपूर्वक बाजूला काढून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. अशी माहिती जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा भाजपा क्रीडा आघाडी प्रदेशाध्यक्ष पै.संदीप भोंडवे यांनी दिली.

या प्रसंगी भाजपा क्रीडा आघाडी प्रदेशाध्यक्ष पै.संदीप भोंडवे , पुणे जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष संदीप सातव,पुणे जिल्हा महीला मोर्चा अध्यक्ष पुनम चौधरी, पुणे जिल्हा भाजपा सचिव प्रदिप सातव, भाजपा हवेली तालुका अध्यक्ष शामराव गावडे, शिवसेना (शिंदे गट) तालुका प्रमुख विपुल शितोळे, भाजपा हवेला तालुका सरचिटणीस गणेश चौधरी, दीनेश झांबरे, व भाजपा व शिवसेना तालुका संघटनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुरंदर हवेली विधानसभा मनसे लढविणार: पाटसकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** पुरंदर - हवेलीची येत्या विधानसभेची निवडणूक पूर्ण ताकदीनिशी मनसे लढवणार असुन सध्या गाव तेथे शाखा आणि वस्ती तेथे मनसे सैनिक ही संकल्पना राबविण्यात येत आहे. जेजुरी औद्योगिक वसाहतीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळाला पाहिजे त्यांना कामगार कायद्याप्रमाणे किमान वेतन व सुविधा मिळाल्या पाहिजेत याकडे लक्ष देणार असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष ऍड. सुधीर पाटसकर यांनी सांगितले.

जेजुरी येथिल कडेपठार मार्गावरील सभागृहात सोमवारी मनसेच्या वतीने विधानसभा आढावा बैठक घेण्यात आली. तसेच सासवड, जेजुरी शहरासह जिल्हा परिषद गट पंचायत समिती गणातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष पोपटराव सुर्यवंशी, तालुकाध्यक्ष उमेश जगताप यांचेसह सुमारे १५०कार्यकर्ते उपस्थित होते.

नियुक्त्या करण्यात आलेले पदाधिकारी पुढीलप्रमाणे , रोहित हरिदास पवार (सासवड शहराध्यक्ष ) , श्रीयश पोपट जगताप (जेजुरी) नितीन रमेश जगताप (माळशिरस गट) निलेश ज्ञानेश्वर जाधव (नीरा कोळविहिरे गट) राजेंद्र सुनील बनकर (वीर परिंचे गट)

पुरंदर तालुका मनसेचे अध्यक्ष उमेश जगताप यांना विधानसभेची उमेदवारी मिळण्याचे संकेत आहेत. पक्ष स्थापनेपासून जेजुरीचे उमेश जगताप हे पक्षाचे एकनिष्ठपणे काम करत आहेत गेली ६ वर्षापासून ते तालुकाध्यक्ष म्हणून कार्यरत राहताना सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग असुन येत्या विधानसभा निवडणुकीसाठी त्यांच्याच नावाची शिफारस मनसे प्रमूख राज ठाकरे यांचेकडे करणार असल्याचे एड्. सुधीर पाटसकर यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष पोपटराव सुर्यवंशी यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आभार महेश शिंदे यांनी मानले.

## विधानसभा

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** जेजुरी येथे विधानसभा आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना एड्. सुधीर पाटसकर



# पारगाव कारखाना कॉलजचे सेट परीक्षेत यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** येथील भीमाशंकर शिक्षण संस्था संचलित,दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील कॉलेजचे प्रा. पूजा पांडुरंग अरगडे (वाणिज्य विभाग),प्रा.आरती दत्तात्रय अस्वारे (विज्ञान विभाग), प्रा.श्रद्धा दयानंद मस्के (कला विभाग), प्रा. प्रतिक विजय पानसरे (शारीरिक शिक्षण विभाग) या प्राध्यापकांनी सेट परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे. कॉलेजचे प्राचार्य मेजर प्रा.डॉ.शत्रुघ्न थोरात व विशेष कार्यकारी अधिकारी बी.डी. चव्हाण यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार व अभिनंदन केले.

संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी प्राध्यापकांचे अभिनंदन केले.



## अ‍ॅड.बापूसाहेब भोंडे हायस्कूल अ‍ॅण्ड जुनिअर कॉलेजमध्ये कवी

# ना. धों. महानोर यांच्या स्मृतींना उजाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणावळा :** निसर्ग कवी ना.धों. महानोर यांच्या पुण्यतिथी निमित्त लोणावळा येथील अ‍ॅड बापूसाहेब भोंडे हायस्कूल व जूनियर कॉलेज येथे कवी ना धों महानोर यांच्या आठवणी जाग्या करत त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

सरस्वती पूजन करून कवी ना.धों.महानोर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आला. यावेळी जेष्ठ कवी लेखक सुधीर मोघे व कवयित्री शुभांगी मांडे, संस्थेच्या सचिव राधिका भोंडे, विद्यालयाचे शैक्षणिक सल्लागार संजय पुजारी, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका माधवी थत्ते, पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अंजुम शेख, माध्यमिक विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका तृप्ती गव्हले, प्राथमिक विभागाच्या उपमुख्याध्यापिका स्मिता इंगळे, पर्यवेक्षिका स्मिता वेदपाठक व शशिकला तिकोणे यांसह शिक्षक उपस्थित होते महानोर यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यालयात शिक्षकांनी पाऊस या विषयावर काव्य निर्मिती केली. या काव्यातून प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. यात अनुक्रमे प्रथम क्रमांक नितीन एकनाथ तिकोणे व योगेश चोरगे, द्वितीय क्रमांक सुमैया शेख व तृतीय क्रमांक चिन्मय जगधनी यांनी पटकावला.

जेष्ठ कवी लेखक सुधीर मोघे व कवयित्री शुभांगी मांडे यांनी यावेळी वेगवेगळ्या कवींच्या कवितांचे वाचन केले. यात प्रामुख्याने ग. दी. माडगूळकर, वसंत देशपांडे, व्यंकटेश कुलकर्णी, सुरेश भट, स्वानंद बर्वे, विठ्ठल दास यांच्या कविता सादर करण्यात आल्या. संस्थेच्या सचिव राधिका भोंडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले तर भाग्यश्री पाटील व अनुप्रिता यादव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. नितीन तिकोणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# रस्त्याची गुणवत्ता पडताळणे गरजेचे : आ.अशोक पवार....

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली :** विकास कामे ही दर्जेदार झालेच पाहिजेत एक आमदार सर्व ठिकाणी फिरून त्या कामांवर लक्ष देवू शकत नाही त्यामुळे माझा सर्वसामान्य कार्यकर्ता देखील एक आमदराच आहे आणि त्यानी विकास कामांवर लक्ष दिले पाहिजेत.हा रस्ता माझा स्वतःचा आहे असे समजून सर्वसामान्य कार्यकर्त्याने कामाची गुणवत्ता पडताळणे गरजेचे आहे.कामाची गुणवत्ता दर्जेदार नसेल तर तो सामान्य कार्यकर्ता देखील ते काम थांबू शकतो असे आवाहन या वेळी आमदार अशोक पवार यांनी केले. पेरणे (ता.हवेली) येथील चौफुला परिसरात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर झालेल्या लोणीकंद ते डोंगर गाव,डोंगरगाव ते वारघडे वस्ती,बकोरी या कॉंक्रीटीकरण रस्त्याच्या (एकूण सात कोटी निधी) रुपयांच्या कामाचे भूमिपूजन शुभारंभ आज नुकतेच शिरूर-हवेलीचे आमदार अशोक पवार यांच्या हस्ते पार पडले.यावेळी आमदार अशोक पवार बोलत होते.

याप्रसंगी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस(शरद पवार) चे प्रदेश सरचिटणीस प्रदिप वसंत कंद, राष्ट्रवादी कॉंग्रेस(शरद पवार) चे हवेली तालुकाध्यक्ष संदिप गोते,राष्ट्रवादी कॉंग्रेस डॉक्टर सेलच्या अध्यक्षा शिवांजली वाळके,खरेदी विक्री संघाचे तालुकाध्यक्ष दादासाहेब माने,पेरणेचे माजी सरपंच अण्णासाहेब टुले, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) चे जिल्हा उपाध्यक्ष साईनाथ वाळके, तुळापुरचे माजी सरपंच गणेश पुजारी, उपस्थित होते.

## तरुणांना योग्य दिशा मिळणे गरजेचे - सत्यजित तांबे

# तरुण भरकटला तर त्याचा परिणाम वाईट होतो

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लोणावळा :** भारत तरुणांचं देश आहे, पण तरुणांना योग्य दिशा मिळाली नाही, तो भरकटला तर त्याचा परिणाम वाईट होतो, ज्याचा अनुभव आपण बांगलादेश मध्ये सध्या जे चालले आहे त्यातून घेत आहे. त्यामुळे योग्य वयातच तरुणांना, त्यांच्या उत्साहाला, त्यांच्या क्रयशक्तीला योग्य दिशा देणे आवश्यक असल्याचे मत विधानपरिषद सदस्य आमदार सत्यजित तांबे यांनी व्यक्त केले. लोणावळा महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'संकल्प नशा मुक्तीचा' या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

लोणावळा एज्युकेशन ट्रस्ट, लोणावळा शहर पत्रकार संघ, लोणावळा पोलीस आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने लोणावळा शहरात 'संकल्प नशा मुक्तीचा' या चळवळीचा प्रारंभ आणि माहिती पत्रकाचे अनावर करण्यात आले. याप्रसंगी आमदार सत्यजित तांबे, मावळचे आमदार सुनील शेळके, आयपीएस सत्यसाई कार्तिक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी लोणावळा कॉंग्रेसचे प्रदेश सचिव निखिल कवीश्वर, एज्युकेशन ट्रस्टचे उपाध्यक्ष दत्तात्रय पाळेकर, सचिव ऍड. निलिमा खिरे, सहसचिव ऍड. अजय भोईर, पत्रकार संघाचे अध्यक्ष विशाल पाडाळे, जयहिंद लोकचळवळीचे शहराध्यक्ष चैतन्य वाडेकर, विशाल विकारी, जकीर खलीपा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी नशामुक्ती संदर्भात करीत असलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी लोणावळा उपविभागीय पोलीस अधिकारी आयपीएस सत्यसाई कार्तिक यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार सुनील शेळके म्हणाले की, मुंबई नगरीची संस्कृती मावळ आणि आजूबाजूच्या परिसरात पसरू लागले आहे. यातून जशा काही चांगल्या गोष्टी घडत आहे तशाच नशेखोरी सारख्या वाईट गोष्टी देखील घडत आहे. मात्र जयहिंद लोकचळवळ 'संकल्प नशा मुक्तीचा' या माध्यमातून एक चांगले उद्दिष्ट घेऊन पुढे चालली आहे. तालुक्यातील युवा पिढीने देखील अशा वाईट गोष्टींपासून दूर राहावे, आपल्या मावळ तालुक्याची मान खाली जाईल असे काही करू नका असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. आयपीएस सत्यसाई कार्तिक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, स्वतःला सकारात्मक विचार असलेल्या मित्रांमध्ये गुंतवून घ्या, नकारात्मक आणि तुम्हाला खाली खेचू बघणाऱ्या लोकांपासून दूर रहा. #रा

## » Selected

### खडकवासला मतदार संघात भगवा सप्ताहाचा शुभारंभ



**खडकवासला :** शिवसेनेतर्फे दिनांक ५ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट या आठवड्यात संपूर्ण राज्यात भगवा सप्ताहचे आयोजन करण्यात येत आहे. खडकवासला मतदार संघातर्फे आज श्रावणी सोमवारच्या मुहूर्तावार धायरी येथील प्रसिद्ध श्री धायरेश्वराचे दर्शन घेऊन या सप्ताहची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी महाराष्ट्रात सुरु असलेली अतिवृष्टी थांबावीण्यासाठी पावसाला विश्रांती द्यावी असे साकडे देवाला घातले. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब यांना पुन्हा संधी मिळावी अशी प्रार्थना करण्यात आली. महाराष्ट्रातील भ्रष्टाचारी राज्यकारभाराची पोलखोल करण्यात आली. तसेच श्री जैतुजी महाराजांचे समाधीचे देखील दर्शन घेण्यात आले. तसेच भगवा सप्ताह निमित्त विविध उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले. उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, विधानसभा प्रमुख नितीन वाघ, शहर संघटक संतोष गोपाळ, जिल्हा संघटक बुवा खाटपे,हवेली तालुका प्रमुख तानाजी पवळे,माजी तालुका प्रमुख संदिप मते,विभागप्रमुख महेश पोकळे, संतोष शेलार,नाना मरगळे, संदिप नवले,अविनाश सरोदे, मछिंद्र शेलार,सौरभ मोकाशी, सुरेश गायकवाड, राज पायगुडे, आकाश यादव, आकाश बालवडकर,संग्राम गायकवाड, कल्पेश वाजे, विकास कांबळे,विजय मते, योगेश चरवड, संजय गोवळकर, सिद्धार्थ पिसाळ, स्वप्रिल वाघ, सुनीता खंडाळकर हे उपस्थित होते. देवस्थानचे अध्यक्ष सोमनाथ रायकर आणि उपसरपंच प्रमोद रायकर यांनी सर्वांचे स्वागत केले.

### पुणे जिल्हा बँकेच्या कायदेशीर सल्लागारपदी अ‍ॅड्. अजय देवकर



**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील मावडी सुपे येथील ॲडव्होकेट अजय एकनाथ देवकर यांची सहकारी क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या व आशिया खंडातील क्रमांक १ ची सहकारी बँक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कायदेशीर सल्लागारपदी तीन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली.

सदर नेमणुकीचे पत्र पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ दिंगंबर दुर्गाडे व पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई व इतर मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. अड अजय देवकर यांच्या नियुक्ती बद्दल जेजुरी शहर पत्रकार संघ,श्री मल्हार शिक्षण मंडळ,व पंचक्रोशीतील त्यांचे अभिनंदन होत आहे.

### टाकळकरवाडीच्या प्रियांका पवारचे एमपीएससी परीक्षेत उत्तुंग यश



**राजगुरूनगर :** टाकळकरवाडी (ता. खेड) येथील कु. प्रियांका भरत पवार हिची एमपीएससी परीक्षेमार्फत जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदी निवड झाली. प्रियांकाचे प्राथमिक शिक्षण टाकळकरवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत तर माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालयात झाले. तिने डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमधून बी. ई. (सिव्हिल) ही पदवी प्राप्त केली. स्पर्धा परीक्षेत मुलींमध्ये ती १३ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. आपल्या यशात आई, वडील, भाऊ व सर्व गुरुजनांचे श्रेय असल्याचे प्रियांकाने नमूद केले. तिच्या यशाबद्दल टाकळकरवाडी ग्रामस्थांनी तिचे विशेष कौतुक केले.

# रक्तदानाद्वारे 'माईर्स'चा स्थापना दिवस साजरा





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लोणी-काळभोरः** माईर्स एमआयटी शिक्षण समुहाच्या ४२ व्या स्थापना दिनाच्या निमित्ताने येथील एमआयटी एमआयटी आर्ट, डिझाईन, आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात, विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदानासारख्या सामाजिक मोहिमेला विद्यापीठात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह, कर्मचाऱ्यांनी उदंड प्रतिसाद दिला. ज्यामुळे, शिबिराअंती तब्बल १०० हून अधिक रक्त पिशव्या संकलीत करण्यात आल्या.

42 वा स्थापना दिवस

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन समारंभात डॉ. अतुल पाटील, संचालक एमआयटी स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंट; प्रा. हनुमंत पवार, सीईओ पेरा इंडिया; प्रा. डॉ. सुरज भोयर, संचालक - विद्यार्थी व्यवहार; डॉ. सुरेश पारधे, रक्त संक्रमण अधिकारी, जिल्हा रुग्णालय, औंध पुणे; डॉ. इम्रान खान, रक्त संक्रमण अधिकारी, ससून रुग्णालय, पुणे; डॉ. अजय हुपले; श्री. शरद देसले, सामाजिक सेवा अधीक्षक, ससून रक्तपेढी; आणि श्री. सुदाम भाकडे यांनी हजेरी लावली. यावेळी उपस्थित प्रत्येक मान्यवराने रक्तदानाचे महत्व विशद करताना, एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या सामाजिक उपक्रमाचे व विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधीलकीचे भरभरून कौतुक केले.

एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष आणि कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करून महविद्यालयीन जिवनाच्या सुरुवातीलाच आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो, हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. ससून रुग्णालय रक्तपेढीच्या माध्यमातून झालेल्या या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमआयटी एडीटी- अँडव्हेंचर क्लबच्या स्वयंसेवकांनी अत्यंत हिरीरीने सहभाग नोंदवत, विद्यार्थ्यांच्या मनातील रक्तदानाविषयीचे गैरसमज दूर करताना त्यांना रक्तदान करण्यास प्रवृत्त केले.

पान १ वरून

## मनीष सिसोदियांचा जामीन अर्ज फेटाळला

आम आदमी पक्षाच्या नेत्याला जबाबदार धरले, तर सिसोदिया यांनी आपण निर्दोष असल्याचे सांगत, आपल्याविरोधात कोणतेही पुरावे नसल्याचे म्हटले आहे. तसेच किमान शिक्षेपैकी निम्मी शिक्षा आपण यापूर्वीच तुरुंगात काढली असल्याचेही त्यांनी सांगितले.

न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर सिसोदिया यांच्या याचिकांवर सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने १६ जुलै रोजी ईडीकडून उत्तर मागितले होते.

## एसटी कर्मचाऱ्यांचा ९ ऑगस्टपासून संप

राज्यभरात एसटीचे २५० डेपो असून, यात वाहक-चालक मिळून जवळपास ५० हजार कर्मचारी आणि कार्यालयीन आणि कार्यशाळेच ३५ हजार कर्मचारी आहेत. ग्रामीण भागासहित पुणे, मुंबई, नाशिक, संभाजी नगर, अकोला, अमरावती, नांदेड आणि नागपूर अशी महानगर येथे जिल्ह्यातील ठिकाणे अशी मिळून जवळपास ५० ते ६० लाखांच्या घरात दैनंदिन प्रवासी प्रवास करतात. एसटीचा संप झाला, तर ही सगळी ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेतील मुख्य साखळी ठप्प होईल, अशी भीती आहे.

## डॉ. माशेलकर यांना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार जाहीर

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदीप रावत आणि अमृतराव पुरंदरे यांची उपस्थिती असेल. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे पुरस्कार या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र आणि एक लाख रुपयाचा धनादेश, तर श्रीमंत मोरेश्वर बळवंत पुरंदरे शिष्यवृत्तीचे स्वरूप प्रशस्तिपत्रक आणि पन्नास हजार रुपयांचा धनादेश असे असेल. या कार्यक्रमास सर्वांसाठी खुला आणि विनामूल्य प्रवेश आहे.

## वक्फ कायद्यात होणार चाळीस सुधारणा!

वक्फ बोर्डांकडे सध्या भारतभरातील ९.४ लाख एकर जमिनीवरील ८.७ लाख मालमत्ता आहेत. सशस्त्र दल आणि भारतीय रेल्वेनंतर ते भारतातील तिसरे सर्वात मोठे जमीनमालक बनले आहेत. वक्फ जमिनींवर ताबा मिळवण्यासाठी हे विधेयक येणार नाही, असे सरकारकडून वारंवार सांगण्यात येत असले, तरी प्रस्तावित कायद्याला तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे.

## क्रॉस व्होटिंग करणाऱ्यांचे तिकीट काँग्रेसने कापले

मोहन हंबर्डे यांच्यावर कारवाईची शिफारस करण्यात आली. त्यानुसार, या पाचही आमदारांना आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून तिकिट देऊ नये, असे आदेश पक्षाने प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना दिले. त्यामुळे अमरावती, वांद्रे पूर्व, इगतपुरी, नांदेड दक्षिण आणि देगलूर या विधानसभा मतदारसंघात नव्या उमेदवारांचा शोध सुरू करण्यात आला आहे.


**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक २४५/२०२४/२१२९

**अर्जदार**
रॉयल गॅलक्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स.नं. १३१/१/२ (पैकी), बालाजी मंदिराजवळ, आळंदी रोड, वडमुखवाडी, ता. हवेली, जि. पुणे- ४१२१०५.
तर्फे, अध्यक्ष : श्री. नरेंद्र रामाजी बगमारे, सचिव श्री. आनंद दादाराव जवंजाळ
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. मे. रॉयल स्पेस नोंदणीकृत भागीदारी संस्था,
तर्फे भागीदार,
अ. श्री. महेश अमरसी सपारीया
ब. श्री. नविन अमरसी सपारीया
क. श्री. वसंत बाबुराव काची
ऑफिस पत्ता- ऑफिस नं. ४९ आणि ५०, कुणाल प्लाझा, चिंचवड, पुणे- ४११ ०१९.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये रॉयल गॅलक्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पत्ताः स.नं. १३१/१/२ (पैकी), बालाजी मंदिराजवळ, आळंदी रोड, वडमुखवाडी, ता. हवेली, जि. पुणे- ४१२१०५ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. २४५/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०७/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. श्वेता गणगे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०८/०८/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : ०६/०८/२०२४

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

**जाहीर नोटीस**

अर्ज क्र.७०/२०२४/१९७७

**अर्जदार**
नियो. राधाकृष्ण पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्या.
पत्ताः-गट नं. २८१/१, मौजे-चिखली, ता. हवेली, जि. पुणे-४१२ ११४.
तर्फे
मुख्य प्रवर्तक, श्री. लक्ष्मण शंकर जाधव.
**विरुध्द**
**जाब देणार**
१.मे.जी. के. असोसिएटस प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स,
तर्फे भागीदारी,
अ.श्री. संदिप गुलाब काटे,
ब.श्री. विजय भगवंत गायकवाड,
क. श्री. पांडूरंग जयवंत गायकवाड,
ऑफीस पत्ताः-मु.पो. जांबे, ता. मुळशी, जि. पुणे.
२. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (६), पुणे.

उपरोक्त अर्जदार यांनी वरिल उल्लेखिलेल्या कायद्यान्वये नियो. राधाकृष्ण पार्क सहकारी गृहरचना संस्था मर्या. गट नं.२८१/१, मौजे-चिखली, ता.हवेली, जि.पुणे-४१२ ११४ या संस्थेच्या नोंदणी करणे कामीचा अर्ज क्र.७०/२०२४ दाखल केला आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. २३/०७/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार नियोजित संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. जाब देणार क्र. १अ,ब, क गैरहजर. सबब जाब देणार क्र. १अ, ब, क यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दि.१३/०८/२०२४ रोजी दु. ३.०० वा. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, साखर संकुल, न. ता. वाडी, शिवाजी नगर, पुणे ४११ ००५ या ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे. सदर सुनावणीस जाब देणार क्र. १अ, ब, क यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायद्यातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २४/०७/२०२४.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक २४६/२०२४/२१२८

**अर्जदार**
केशव रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : स.नं. १७/१क/१ (पैकी), धानोरी, ता. हवेली, जि. पुणे- ४११०१५.
तर्फे, अध्यक्ष : श्री. शंकर पॉल, सचिवः श्री. संपत परवते
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. एस. के. डेव्हलपर्स, ऑफिस पत्ता- स.नं. १७, हिस्सा नं. १क/१, सिध्दार्थ नगर, लेन नं. २, धानोरी, लोहगांव रोड, ता. हवेली, जि. पुणे-४११०१५.
तर्फे प्रोप्रायटर, श्री. संजिव केशव काळकुंडे,
रा. रोझ परेड, बी-१, फ्लॅट नं. १००३, एन.आय.बी.एम रोड, कोंढवा, पुणे- ४११०४८.
जागा मालक / जाब देणार नं.२
२.श्री. संजिव केशव काळकुंडे, रा. रोझ परेड, बी-१, फ्लॅट नं. १००३, एन. आय. बी. एम रोड, कोंढवा, पुणे- ४११०४८.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये केशव रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पत्ताः स.नं. १७/१क/१ (पैकी), धानोरी, ता. हवेली, जि. पुणे- ४११०१५ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. २४६/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०७/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. श्वेता गणगे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०८/०८/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ व २ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : ०६/०८/२०२४

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
(त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये नोटीस. कार्यालय : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल तळमजला, शिवाजीनगर, पुणे

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक २४७/२०२४/१९७८

**अर्जदार**
ब्रुकसाईड सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : सर्वे नं.७/५ ए (पैकी), कळस, ता. हवेली जि. पुणे- ४११०१५. तर्फे, अर्जदार, अध्यक्षः श्री. प्रकाश पांडुरंग विश्वासराव, सचिव : श्री. मनोज सुरेशराव सुर्यवंशी

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
१.मे. ब्राईट डेव्हलपर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था, ऑफिस पत्ता- डी बिल्डींग, स.नं. ३९/१, सिद्धेश्वरनगर, विश्रांतवाडी, ता. हवेली जि. पुणे - ४११०१५. तर्फे भागीदार, (Members of Joint Venture)
ए. श्री. संजय श्रध्दानंद त्यागी, रा. स.नं. ३९/१, सिद्धेश्वरनगर, वी ३/२, विश्रांतवाडी, ता. हवेली जि. पुणे - १५ बी. श्री. राजीव श्रध्दानंद त्यागी, रा. स.नं. ३९/१, सिद्धेश्वरनगर, बी ३/२९, विश्रांतवाडी, ता. हवेली जि.पुणे - १५ सी. श्री. राधेश्याम आर. अगरवाल, रा. रोशनी व्हिला, प्लॉट नं. ३०/ओ, कस्तुरबा हौसिंग सोसायटी, विश्रांतवाडी, ता. हवेली जि. पुणे- ४११०१५. डी. श्री. प्रमोद राधेश्याम अगरवाल, रा. स.नं.३९/३, सिद्धेश्वरनगर, ए१/६०४ विश्रांतवाडी, ता. हवेली जि. पुणे-
२.ए. i] श्री. विठ्ठल रामभाऊ धापटे, ii) सौ. वैजयंती विठ्ठल धापटे, iii) सौ. शितल पराग तुपे, iv] श्री. विशाल विठ्ठल धापटे, बी.i) श्री. शिवाजी रामभाऊ धापटे, ii) सौ. शशिकला शिवाजी धापटे iii) शिल्पा शिवाजी धापटे, iv) सौ. सुनिता उर्फ निशा विकास वाघिरे, सी.) श्री. विलास रामभाऊ धापटे ii) सौ. शोभा विलास धापटे, iii) श्री. राहुल विलास धापटे, iv) आरती विलास धापटे
डी.i) श्री. सुनिल रामभाऊ धापटे, ii) सौ. सुवर्णा सुनिल धापटे, ई.iii) श्रीमती. चंद्रभागाबाई रामभाऊ धापटे जाब देणार नं. २ए ते ई सर्व रा. ८८, राजहंस, विशाल परीसर, कळस, ता. हवेली जि.पुणे- ४११०१५.
एफ. i] सौ. मंगल अंकुश मते, ii) श्री. अभिजीत अंकुश मते
जाब देणार नं. 2 एफ रा.मु. पो. किरकटवाडी (कोल्हेवाडी) सिंहगड रोड, पुणे- ४११०२४.
३. ए. i] श्री. विठ्ठल रामभाऊ धापटे, ii) सौ. वैजयंती विठ्ठल धापटे, iii) सौ. शितल पराग तुपे iv] श्री. विशाल विठ्ठल धापटे, बी. i] श्री. शिवाजी रामभाऊ धापटे, ii) सौ. शशिकला शिवाजी धापटे iii] शिल्पा शिवाजी धापटे, iv] सौ. सुनिता उर्फ निशा विकास वाघिरे, सी.i) श्री. विलास रामभाऊ धापटे, ii ) सौ. शोभा विलास धापटे, iii) श्री. राहुल विलास धापटे, iv) आरती विलास धापटे
डी.i) श्री. सुनिल रामभाऊ धापटे, ii) सौ. सुवर्णा सुनिल धापटे, ई. i] श्रीमती. चंद्रभागाबाई रामभाऊ धापटे
जाब देणार नं. २ ए ते ई सर्व रा. ८८, राजहंस, विशाल परीसर, कळस, ता. हवेली जि. पुणे- ४११ ०१५.
एफ. i] सौ. मंगल अंकुश मते, ii) श्री. अभिजीत अंकुश मते
जाब देणार नं. २ एफ रा. मु.पो. किरकटवाडी (कोल्हेवाडी) सिंहगड रोड, पुणे- ४११ ०२४.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये ब्रुकसाईड सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पत्ता : सर्वे नं.७/५ ए (पैकी), कळस, ता. हवेली जि. पुणे- ४११०१५ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. २४७/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. १८/०७/२०२४ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. श्वेता गणगे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ए ते २एफ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ए ते २एफ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक ०८/०८/२०२४ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. २ए ते २एफ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल जिल्हा याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २४/०७/२०२४.

शिक्का

सही/-
**संजय राऊत**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**दौंड नगरपरिषद, दौंड, जिल्हा - पुणे**
**ब वर्ग नगरपरिषद**
नगरपरिषद टाऊन हॉल व कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, दौड पुणे ४१३ ८०१.
Email ID: doundmc@gmail.com दूरध्वनी क्रमांक ०२११७ - २६२४४४/२६२३२४

जा.क्रं.दौनप/२०७९/२०२४ | दिनांक :- ६/८/२०२४

**जाहिर निविदा**
**स्वच्छता विभाग**

सर्व संबंधित ठेकेदार यांना या जाहिर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, दौंड नगरपरिषद हद्दीतील खालील कामाचे सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. संबंधीत ठेकेदाराकडे योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड नंबर व जी.एस.टी. नंबर दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. अधिकच्या शर्ती नगरपरिषद बांधकाम विभागात उपलब्ध आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | अनामत रक्कम | निविदा फॉर्म फी | मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | दौड नगरपरिषदेकडील उपलब्ध सक्शन-कम-जेटोग मशिनवर १ वाहनचालक व २ मजुर पुरविणे व बांधकाम विभागासाठी अनुभवी संगणक ऑपरेटर पुरविणे. | १५००/- | ३००/- | १२ महिने |
| २. | दौड नगरपरिषद कार्यालयीन वाहन (कार) हे वाहन चालविण्यासाठी १ वाहन चालक पुरविणे. | १५००/- | ३००/- | १२ महिने |
| ३. | दौंड नगरपरिषदेकडील उपलब्ध वाहनांचे संपूर्ण सव्हीसिंग, किरकोळ दुरुस्ती, बॅटरी घेणे व नविन टायर ट्युब घेणे. | १५००/- | ३००/- | १२ महिने |
| ४. | दौड नगरपरिषद स्वच्छता विभागासाठी सेफ्टी साहित्य पुरविणे. | १५००/- | ३००/- | १२ महिने |
| ५. | दाँड नगरपरिषद हद्दीतील धोकादायक व जीर्ण झालेली झाडे सुरक्षितपणे काढणे. | १५००/- | ३००/- | १२ महिने |
| ६. | दौंड नगरपरिषद स्वच्छता विभागसाठी २ मडपंप खरेदी करणे. | १५००/- | ३००/- | १२ महिने |
| ७. | दौंड नगरपरिषद स्वच्छता विभाग, पाणीपुरवठा विभाग, अग्निशमन विभाग, कार्यालयीन विभाग, विदयुत विभाग व इतर विभागासाठी कर्मचा-यांना दैनंदिन कामासाठी गणवेश पुरविणे (कपडे घेणे, शिलाई करणे, नगरपरिषदेचा लोगो इ.) | १५००/- | ३००/- | १२ महिने |

सदर बाबत कोरे निविदा फॉर्म दि.०७/०८/२०२४ ते दि. १३/०८/२०२४ पर्यंत या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील. सदरच्या सिलबंद निविदा दि. १४/०८/२०२४ रोजी सोबत अनामत रक्कम भरलेचे या कार्यालयाचे पावतीसह सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहोच कराव्यात. कोणतीही निवीदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार राखुन ठेवणेत आला आहे. शक्यतो प्राप्त झालेले निविदा उपस्थित ठेकेदार यांचे समक्ष दि. १४/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मा. मुख्याधिकारी यांचे कक्षात उघडण्यात येतील. याबाबतच्या अटी व शर्ती या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत पहावयास मिळतील.

शिक्का

सही/-
**मुख्याधिकारी**
दौड नगरपरिषद, दौंड.
दौंड जि.पुणे



**जाहीर बी-१ निविदा सुचना क्रं.१०/२०२३-२०२४**
**पंचायत समिती शिरुर ता. शिरुर जि. पुणे**

**निविदा नोटीस**

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर यांचे तर्फे खालील कामाचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडून खाली नमुद कामाच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविणेत येत आहेत. को-या निविदेचा नमुना ग्रामीण पाणी पुरवठा बांध. उपविभाग शिरुर, पंचायत समिती शिरुर, ता. शिरुर जि. पुणे या कार्यालयातून दिनांक. ०७/०८/२०२४ ते दि.१३/०८/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते संध्या ५.०० वाजे पर्यंत देण्यात येतोल. सीलबंद भरलेल्या निविदा मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शिरुर ता. शिरुर जि. पुणे येथे दि.१४/०८/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत स्विकारणेत येतील आणि शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यांनतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समिती समोर उघडणेत येतील.

| | कामाचे नाव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | कंत्राटदार वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | दहिवडी गारगोटे वस्ती गवळी बाबा समाज मंदिर परिसर सुधारणा | ९.९९,७१४/- | १% | ५६० रु | ३ महिने | सर्वसाधारण खुला) प्रवर्ग १ ते ७ पर्यंत |
| २) | इनामगाव मधुकर किसन मचाले घर ते बबन मामा घालमे वस्ती रस्ता | ९,९९,७६७/- | १% | ५६० रु | ३ महिने | वरिल प्रमाणे |
| ३) | कळवंतवाडी गावठाण ते खंडोबा मंदिर रस्ता | ९.९९.९१३/- | १% | ५६० रु | ३ महिने | वरिल प्रमाणे |
| ४) | कवठे येमाई ग्रा.मा ८१ पासून वैभव पडवळ शेताकडे जाणारा रस्ता | ९.९९.८५६/- | १% | ५६० रु | ३ महिने | वरिल प्रमाणे |

निविदेच्या अटी व शती खालील प्रमाणे
१) को-या निविदा संघासाठी अर्जा सोबत उपरोक्त कामाचे नावासमोर नमुद केले प्रमाणे योग्य त्या वर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र मुळ प्रती दाखविले नंतर त्यांना कोरे निविदा संध्यासाठी भरणा चलन तयार करुन देणेत येईल.
२) मा. गटविकास अधिकारी शिरुर यांचे कडे मिळतील.
३) सीलबंद निविदेच्या लिफाफा क्रं.१ मध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.
अ) जि. प. कडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत.
इ) इसारा रक्कम कोणत्याही बँकेवरील धनाकर्ष डी डी / धनादेश गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती शिरुर या नावे काढणेत आलेला धनाकर्ष (DD) बयाणा रक्कम सुट प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही. तसेचे सु.बे.अ. व म.स.स यांनी ही खुल्या गटातील निविदा असल्याने बयाणा रक्कम भरणे बंधन कारक आहे. ई) प्राप्तीकर पॅनकार्डव जी एस टी प्रमाणपत्र शेवटचे तीन वर्षाचे आय टी आर PTRA and PTC.
**टिप :-** उपरोक्त कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल. व आर्थिक लिफाफा (Financial Bid) उघडणेत येणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
४) सील बंद निविदेच्या लिफाफा क्रं. २ मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वतःचा सही व शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला खात्याने साक्षंकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.
५) अ) पात्र निविदा धारकांकडून विहीत सुरक्षा अनामत रक्कम ही कामाचा करारनामा करते वेळी गटविकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती शिरुर यांचे नांवे ठेव पावती स्वरुपात चलनाने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरीत अनामत रक्कम प्रथम देयकांतून कपात केली जाईल.
ब) Incurance towards labour is considered in rate abstract of DSR item. The constract or shall Produce the Labour insurance policy, else following amount will be deducted from his first R.A Bill A)Work Value upto 25.00 Lakhs :-1.00% and B) Work Value above 25.00 Lakhs :- 0.50%.
६) निविदा देकार १% पर्यंत कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षाअनामत भरण्याची आवश्यकता नाही
७) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १.०१% पासून ते १०% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन कामाच्या किंमतीच्या १% एवढया रकमेचा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरुर येथे देय असलेला खाते क्रं. २६/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं.२ मध्ये सादर करावा. (उदा. १ ते १०.००% पर्यंत कमी दर १% रक्कम)
८) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढ्या रकमेचा वरील (४) प्रमाणे येणा-या रकमेसह पुणे येथे देय असलेला मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.पुणे खाते क्रं. २६/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) जो परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १०% पर्यंत कमी दर १% व (१० % ते १५ % पर्यंत कमी दरनो प्रति टक्का १% दराने) ५% असे एकूण ६% रक्कम)
९) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरपेक्षा १५% पेक्षा कमी दराचा असल्यास देकार १५% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे. त्याच्या दोन पटीने वरील (५) प्रमाणे येणा-या रकमेसह मा. गटविकास अधिकारी पंचायत समिती शिरुर खाते क्रं. २६/१ या नावाने काढलेला धनाकर्ष (डी. डी) (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून लिफाफा क्रं. २ मध्ये सादर करावा. (उदा. १५ पर्यंत कमी एकूण ६% रक्कम) व १९% पर्यंत कमी दर (१९% - १५%) ४% X२ = ८%) असे एकूण १४% रक्कम सदर डी. डी. सादर केलेला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.
१०) निविदाप्रपत्रातील व निविदा नोटीसमधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारांवर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण ने देता फेटाळण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणा-या कोणत्याही व्यक्तीला/संस्थेला फेटाळल्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

**गटविकास अधिकारी (उ.श्रे)**
**पंचायत समिती शिरुर**



# बांगलादेशात अराजकता

भारत आपल्या लष्कराला सतर्क ठेवताना, बांगलादेशवर प्रतीक्षा करा आणि पहा अशी रणनीती ठेवली असल्याचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी मंगळवारी संसदेत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत सांगितले.

## प्रतीक्षा करणे हीच रणनीती

### परराष्ट्रमंत्र्यांनी स्पष्ट केली भूमिका

भारत आपल्या लष्कराला सतर्क ठेवताना, बांगलादेशवर प्रतीक्षा करा आणि पहा अशी रणनीती ठेवली असल्याचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी मंगळवारी संसदेत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत सांगितले.

बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी राजीनामा दिल्यानंतर आणि आरक्षण कोट्याविरोधात सुरू झालेल्या आंदोलनात शेकडो लोक मारले गेल्यानंतर त्यांनी देश सोडल्यानंतर, जयशंकर यांनी मंगळवारी या घडामोडींचा भारतावर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर भाष्य केले आणि कोणती रणनीती असेल, याबद्दल सांगितले.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बांगलादेशातील घडामोडींमध्ये बाहेरील शक्तींच्या भूमिकेबद्दल सरकारला काही माहिती आहे का, असे विचारले असता जयशंकर म्हणाले की, सरकारकडे पाकिस्तानी हस्तक्षेपाबाबतची माहिती आहे, असे सांगितले. शेख हसीना यांच्या योजनांची काही कल्पना आहे का, अशीही विचारणा राहुल यांनी केली. तेव्हा जयशंकर यांनी ही माहिती उघड करता येणार नाही, असे स्पष्टपणे त्यांना सांगितले.

या सर्वपक्षीय बैठकीला, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत, काँग्रेसचे नेते केसी वेणुगोपाल, द्रमुकचे टीआर बालू, जेडीयूचे लल्लन सिंग, समाजवादी पक्षाचे राम गोपाल यादव, तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंदोपाध्याय आणि डेरेक ओब्रायन, आरजेडी अध्यक्ष डॉ. मीसा भारती, उबाठाचे अरविंद सावंत, बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा, सुप्रिया सुळे आणि टीडीपीचे राम मोहन नायडू उपस्थित होते.




## १० हजारांहून अधिक विद्यार्थी

बांगलादेशमधील १० हजारांहून अधिक भारतीय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी भारत बांगलादेशच्या लष्कराच्या संपर्कात आहे, असे जयशंकर यांनी सांगितले. बांगलादेशातील आंदोलकांनी अल्पसंख्याकांच्या घरांना आणि मालमत्तांना लक्ष्य केले आहे, हेही त्यांनी नमूद केले.

## भारताच्या संबंधांवर परिणाम होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशात जे काही झाले, ते भारतासाठी फारसे चांगले नाही. याला दोन कारणे आहेत. एक तर यामुळे भारत-बांगलादेशच्या द्विपक्षीय संबंधांवर काही प्रमाणात परिणाम होईल. दुसरे म्हणजे तिथे स्थापन झालेल्या नव्या सरकारचा कल चीनकडे असण्याची शक्यता आहे. शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारशी जसे भारताचे संबंध होते, तसे संबंध हंगामी सरकारसोबत असावेत, अशी अपेक्षा करता येणार नाही.



ज्या शेजारी देशांशी आपली सीमा आहे, तेथील राजकीय अस्थिरता चांगली नाही, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. याचा परिणाम केवळ राजनैतिक संबंधांवरच नाही, तर व्यावसायिक संबंध आणि नागरी संबंधांवरही होतो. भारताची बांगलादेशशी ४,०९६.७ किमीची सर्वात लांब सीमा आहे. राजनैतिक संबंधांबद्दल बोलायचे झाले, तर बांगलादेशच्या १९७२ मध्ये उदय झाल्यानंतर, त्याच्याशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणारा, भारत हा पहिला देश होता.

बांगलादेशच्या राजकारणात गेल्या पाच दशकांत अनेक चढ-उतार आले असले, तरी भारत-बांगलादेश संबंधांमध्ये फारसे चढ-उतार आलेले नाहीत. शेख हसीना या भारतसमर्थक होत्या आणि दीर्घकाळ त्या सत्तेत होत्या. त्याआधीही २००१ पर्यंत त्या सत्तेत असताना, भारतासोबतचे संबंध अधिक दृढ झाले होते. सध्या तरी लष्कर तेथील सत्ता काबीज करणार असून, ते भारताबाबत तटस्थ राहण्याची शक्यता आहे. पाकिस्तानात जेव्हा लष्कर हातात सूत्रे घेते, तेव्हा ते भारताच्या विरोधात काम करते, परंतु बांगलादेशच्या बाबतीत असे होणार नाही. शेख हसीना यांच्या पक्षाने सरकार स्थापन केले नाही आणि दुसऱ्या पक्षाने सरकार स्थापन केले, तर ते चीनकडे झुकण्याची भीती आहे.

## भारताची चिंता वाढली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** बांगलादेशमधील बिघडत चाललेल्या परिस्थितीमुळे भारताची चिंताही वाढली आहे. शेख हसीना यांच्या कार्यकाळात बांगलादेश हा भारताचा चांगला मित्र राहिला आहे. शेख हसीना यांनी बांगलादेश सोडल्यानंतर परिस्थिती तशी कायम राहणार नाही. ज्या प्रकारच्या बातम्या येत आहेत, त्यात पाकिस्तानशी संबंधित काही संघटना आणि भारतविरोधी शक्तींचा सरकारमध्ये सहभाग असल्याचे बोलले जात आहे. तसे झाले तर आगामी काळात भारताच्या अडचणी वाढणार आहेत.

लष्करप्रमुखांनी अंतरिम सरकार स्थापन करण्याची घोषणा केली आहे. शेख हसीना यांचा पक्ष या सरकारमध्ये सामील होणार नसल्याचे वृत्त आहे. बांगलादेश नॅशनल पार्टी आणि जमात-ए-इस्लामी हे दोन पक्ष सरकारमध्ये सहभागी झाले आहेत. मात्र हे दोन्ही पक्ष भारतविरोधी आहेत. जमात-ए-इस्लामीचे पाकिस्तानशी असलेले संबंध सर्वश्रुत आहेत. त्याचबरोबर बांगलादेश नॅशनल पार्टीला जेव्हा संधी मिळाली, तेव्हा त्याने भारताविरोधात नकारात्मक गोष्टी बोलल्या आहेत. शेख हसीना यांनी पंतप्रधान असताना, त्यांनी भारतविरोधी शक्तींना लगाम घातला होता. पण आता परिस्थिती कशी असेल, हे सांगता येत नाही. भारतविरोधी शक्ती बांगलादेशच्या भूमीचा वापर दहशतवादी कारवायांसाठी करणार नाहीत, हेही पाहावे लागेल.

## जनरल जमानबाबत दिला होता इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशातील अराजकाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पंतप्रधान हसीना यांना राजीनामा द्यावा लागला. तेथील लष्कराने सरकार स्थापनेत भूमिका बजावली आहे. भारताने वर्षभरापूर्वी जनरल जमान यांच्याबाबत शेख हसिना यांना सावध केले होते. २३ जून २०२३ रोजी बांगलादेशच्या लष्करप्रमुखपदी नियुक्ती होण्यापूर्वी भारताच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शेख हसीना यांना जनरल झमान यांच्या चीनकडे झुकण्याबाबत सावध केले होते. असे असतानाही, जनरल जमान यांची लष्करप्रमुखपदी नियुक्ती करून हसीना यांनी भारतीय सुरक्षा यंत्रणांचा सल्ला न मानण्याची किंमत मोजली आहे.



देशातील वाढती निदर्शने थांबवण्याऐवजी जनरल जमान यांनी शेख हसीना यांना देश सोडण्याचा सल्ला दिला. १५ वर्षे पंतप्रधानपदी असलेल्या हसीना यांना लष्कराने केवळ ४५ मिनिटांचा अवधी दिला.

## भारतीय सुरक्षा यंत्रणा सतर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार उलथल्यानंतर भारतीय सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सतर्क झाल्या आहेत. बांगलादेशला लागून असलेल्या भारताच्या सीमेवर अत्यंत दक्षतेने लक्ष ठेवले जात आहे. बीएसएफने आपल्या सुरक्षित भागाच्या सीमेवर सतर्कतेचा इशारा दिला आहे. संभाव्य घुसखोरी रोखण्यासाठी सुरक्षा दलाला बारकाईने लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

बीएसएफने ४,०९६ किलोमीटर लांबीच्या सीमेवर सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. भारत-बांगलादेश सीमा सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी बीएसएफचे महासंचालक दलजीत सिंह चौधरी आणि त्यांच्यासमवेत इतर वरिष्ठ अधिकारी पश्चिम बंगालमध्ये दाखल झाले.


## मंदिरांवर हल्ले, हिंदू बनले शिकार

### हिंदू पत्रकार-नेत्यांच्या क्रूर हत्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशातील अराजकतेमुळे पंतप्रधान हसीना शेख यांना देशाबाहेर पळावे लागले. सोमवारी त्यांचे विमान गाझियाबादच्या हिंडन विमानतळावर उतरले. हा भारतीय वायुसेनेचा हवाई अड्डा आहे. त्यांचे विमान भारताच्या सीमेत दाखल झाले, त्यावेळी भारतीय सुरक्षा यंत्रणांनी त्यावर लक्ष ठेवले होते. हे विमान पाटणाहून उत्तर प्रदेशात दाखल झाले.

शेख हसीनांनी बांगलादेश सोडल्यानंतर तेथील लष्करप्रमुख जमान यांनी विरोधी पक्षांशी चर्चा करून सरकार स्थापन करणार असल्याची माहिती दिली. दंगेखोरांनी बांगलादेशची राजधानी ढाकाच्या धानमंडी स्थित 'सुधा सदन'ला आगीत भस्मसात केले. लुटमार सुरू केली.



पंतप्रधानांच्या 'गण भवन'मध्ये घुसून सामानाची नासधुस केली. दरम्यान यात एका हिंदू पत्रकाराची हत्या झाली असल्याची धक्कादायक घटना घडल्या. या सर्व हिंसाचारावेळी हरधन रॉय नावाच्या हिंदू नगरसेवकाला मारहाण करण्यात आली. याशिवाय इस्कॉन मंदिर तसेच बांगलादेशातील हिंदू धर्मस्थळांची तोडफोड करण्यात आली. काली मंदिरात घुसून तोडफोड केली गेली. बांगलादेशामध्ये सुरू असलेल्या प्रकरणामुळे तेथील हिंदू भयभीत झाले आहेत. पत्रकार प्रदीप कुमार भौमिक यांची हत्या करण्यात आली.

## अल्पसंख्याकांच्या सुरक्षेची खात्री झाली पाहिजे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेशातील अल्पसंख्याकांच्या सुरक्षेसाठी आणि मानवी हक्कांसाठी प्रभावी पावले उचलणे, ही जागतिक समुदायाची जबाबदारी आहे. भारतीय परंपरेने आजवर जगभरातील शोषित समाजांना मदत केली आहे. बांगलादेशातील अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठी भारत सरकारने शक्य ती सर्व पावले उचलावीत, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ वकील आलोक कुमार यांनी मंगळवारी झालेल्या एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना केले.

## एअर इंडियाची उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली :** बांगलादेशात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या सरकारविरोधी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर एअर इंडियाने मंगळवारी राष्ट्रीय राजधानीतून ढाक्याला जाणारी सकाळची उड्डाणे रद्द केली. बांगलादेश अनिश्चिततेच्या गर्तेत सापडला आहे.

इंडिगो आणि विस्ताराने मंगळवारी बांगलादेशच्या राजधानीला जाणारी आपली सर्व उड्डाणे रद्द केली. विस्तारा मुंबईहून दररोज आणि दिल्ली ते ढाका दरम्यान आठवड्यातून तीन उड्डाणे चालवते.



## पश्चिम बंगालचे केंद्राला सहकार्य



पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बांगलादेशात सुरू असलेल्या अशांतता आणि सत्ताबदलाच्या पार्श्वभूमीवर देशवासियांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाला पश्चिम बंगाल सरकार पाठिंबा देईल, असेही त्यांनी म्हटले. त्याचवेळी बंगालच्या जनतेने शांतता राखण्याचे आवाहन त्यांनी केले. ममता बॅनर्जी म्हणाल्या की, मी बंगालच्या जनतेला शांतता राखण्याचे आवाहन करते. कोणत्याही अफवांकडे लक्ष देऊ नका. हा दोन्ही देशांमधला विषय असून, केंद्र सरकार जो निर्णय घेईल, त्याला आमचा पाठिंबा असेल, असेही त्यांनी सांगितले.

## दीड लाख क्युसेक्स विसर्ग; कालवे मात्र कोरडेच

# उजनी काठोकाठ; शेतकऱ्यांकडे पाठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्यात गेले काही दिवस होत असलेल्या जोरदार पावसामुळे आणि उणे साठा झालेले उजनी धरण पूर्णपणे भरले; मात्र शेतकऱ्यांना गरज असताना उजनीचे कालवे मात्र कोरडे पडले आहेत. सोलापूर जिल्ह्यात गेल्या पंधरा दिवसात पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांना कालव्याच्या पाण्याची प्रतीक्षा आहे. उजनी आणि वीर धरणातून जवळपास दीड लाख क्युसेक विसर्गाने चंद्रभागेत पाणी येत असताना त्याचा शेतकरी वर्गाला उपयोग होताना दिसत नाही.

### १६ दरवाजे उघडले

● उजनी धरणाचे १६ दरवाजे ४० सेंटीमीटरने उघडले असून धरणातून भीमा पात्रात २१ हजार क्युसेकने विसर्ग करण्यात आला. मात्र, रात्री ८ नंतर ४० हजार क्युसेकने हा विसर्ग करण्यात येत आहे. भीमा काठाच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दौंड बंधाऱ्यातून उजनी धरणाच्या भीमा नदी पात्रात ९५ हजार क्युसेक इतका विसर्ग येत आहे. उजनी धरण हे एकूण ११७ टीएमसी क्षमतेचे असून सध्या धरणात १११.७७ टीएमसी पाणीसाठा झाला आहे.

जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या नीरा नरसिहपूर येथे भीमा आणि नीरा नदीचा संगम होऊन हे सर्व पाणी पंढरपूरकडे येते. सध्या याच वीर धरणातून सोडलेल्या पाण्याने भीमा दुथडी भरून वाहत असली तरी कालवे कोरडेच असल्याने जिल्हावासियाना कालव्यातील पाण्याची प्रतीक्षा आहे.

धरणातून विसर्ग होत असला तरी कालव्यात पाणी मात्र सोडले जात नसल्याने शेतकरी नाराज आहे. शासनाने उजनीच्या कालव्यात पाणी सोडून सर्व पाझर तलाव भरून घ्यावेत, अशी मागणी युवासेनेचे जिल्हाप्रमुख गणेश इंगळे यांनी केली आहे.

उजनी मुख्य कालव्याच्या काही भागात अस्तरीकरणाचे काम सुरू असल्याने कालव्यात पाणी सोडता आले नसल्याचे कार्यकारी अभियंता रावसाहेब मोरे यांनी सांगितले. ५०० क्युसेक विसर्गाने मुख्य कालव्यात पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. बुधवारी सकाळपासून पूर्ण क्षमतेने म्हणजे ३००० क्युसेक विसर्गाने पाणी सोडले जाईल असे त्यांनी सांगितले. उजनी सध्या १०८ टक्के भरले असून आता उजनीतून सीना माढा, दहिगाव उपसा सिंचन योजना व बोगदा यातूनही पाणी सोडले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

## अवकाळी पावसाच्या नुकसानापोटी

# ५९६ कोटी वितरणास मान्यता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जानेवारी ते मेअखेर वेळोवेळी अवकाळी पावसाने केलेल्या शेतीच्या नुकसानीपोटी ५९६ कोटी ९६ हजार रुपये वितरणास मान्यता देण्यात आली आहे. नाशिक, अमरावती आणि नागपूर विभागांत सर्वाधिक नुकसान झाले असून २ लाख १७ हजार ६९० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. नाशिक विभागात १०८ कोटी २१ लाख २० हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे.



या नुकसानीचे पंचनामे करून वेळोवेळी विभागीय आयुक्तांकरवी प्रस्ताव सादर करण्यात आले होते. पुणे विभागात ५८ कोटी ३ लाख, ९९ हजार, अमरावती विभागात सर्वाधिक ३८२ कोटी १२ लाख ४१ हजार तर नागपूर विभागात १०० कोटी ४ लाख ९५ हजार रुपयांची मदत वितरित करण्यास मान्यता दिली आहे. ही मदत डीबीटी पोर्टलद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. ही मदत २ ते ३ हेक्टरच्या मर्यादेत देण्यात येणार आहे.

अवकाळी पावसामुळे राज्यात रब्बी पिकांबरोबरच उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. द्राक्षे, संत्री, भाजीपाला, कांदा आदी पिके वाया गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. याआधी जानेवारी महिन्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीपोटी २२५३ कोटी २२ लाख रुपये वितरित करण्यास मान्यता देण्यात आली होती.

ही मदत नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत झालेल्या नुकसानीपोटी देण्यात आली होती. मात्र, जानेवारीपासून उन्हाळ्यात अवेळी पाऊस झाल्याने ठिकठिकाणी नुकसान झाले होते. त्यांचे ११ प्रस्ताव राज्य सरकारला प्राप्त झाले होते. राज्य आपत्ती निवारण निधीतून ही रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## विशाळगड हिंसाचार; १७ जणांना जामीन

**कोल्हापूर :** विशाळगड अतिक्रमणमुक्तीच्या आंदोलनावेळी झालेल्या हिंसाचारप्रकरणी एकूण पाच गुन्हे नोंदवण्यात आले होते, तर २४ जणांना अटक करण्यात आली होती. यातील १७ जणांना आज (दि. ६) जिल्हा न्यायालयाने जामीन मंजूर केला. तर सात जणांचा जामीन फेटाळण्यात आला आहे.विशाळगड अतिक्रमण मुक्तीच्या माजी खासदार संभाजीराजे यांच्या मोहिमेला १४ जुलै रोजी हिंसक वळण लागले होते. गजापूर ते विशाळगड या सुमारे पाच किलोमीटर परिसरात प्रचंड दगडफेक, तोडफोड करण्यात आली होती. घरे, दुकानांसह मशिदीला लक्ष्य करत आंदोलकांनी हल्लाबोल केला होता. दुकाने, वाहनांसह काही घरांची जाळपोळ करण्याचाही प्रयत्न झाला होता. विशाळगड अतिक्रमण मुक्तीला हिंसक वळण लागले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## लाडकी बहीण योजनेला बळकटी देणार : अजित पवार



**मुंबई :** अशक्य गोष्ट शक्य करणे हीच माझी ओळख आहे. तोच माझा स्वाभिमान आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण ही कल्याणकारी योजना विरोधकांना बंद पाडायची आहे, परंतु या योजनेला अधिक बळकटी देवून या योजनेची रक्कम वाढवण्यासाठी मी प्रयत्न करेन, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सोशल मिडीयावर पोस्ट करत केले आहे.

आपल्या पोस्टमध्ये पवारांनी लिहिले आहे की, माझी लाडकी बहीण योजना टिकवणं अशक्य आहे असं विरोधक म्हणत आहेत. पण, ते अशक्य ते शक्य करणे हाच माझा स्वभाव आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी 'लाडकी बहीण', 'लाडका भाऊ..' योजना अशा प्रकारच्या योजना आणण्यापेक्षा सरकारने थेट माझा लाडका मतदार योजना जाहीर करून टाकावी असे म्हटले आहे. अशी योजना जाहीर केल्यास थेट सगळ्यांना पैसे वाटण्याचा मार्ग मोकळा होईल. बाकी दुसरी काही भानगडच नको.

महाराष्ट्र सरकारने या योजनेचा फॉर्म भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंतची मुदत दिली होती. राज्यभरात होणारी महिलांची गर्दी पाहता आता अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. ज्या महिलांनी अद्याप या योजनेसाठी अर्ज दाखल केला नाही, त्यांना ३१ ऑगस्टपर्यंत या योजनेसाठी अर्ज करता येणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे.



## » Selected

## आंबेडकरांनी कायद्याचा अभ्यास करावा : राऊत

**नवी दिल्ली :** वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच आहे, असे विधान केल्यानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रकाश आंबेडकरांना कायद्याचा आणि लोकभावनेचा अभ्यास करावा लागेल, अशी प्रतिक्रिया दिली आहे.ते म्हणाले की, आम्ही रामदास आठवले यांचा पक्ष खरा आंबेडकरवादी पक्ष आहे, तर प्रकाश आंबेडकर यांच्या मनाला किती यातना होतील? पण प्रकाश आंबेडकर हे बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे खरे वारसदार आहेत. त्यांनी तो वारसा पुढे चालवावा.

प्रकाश आंबेडकर यांनी, म्हटले होते की, खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच आहे. शिवसेनेची पारंपरिक मते शिंदेंबरोबर आहेत. शिवसैनिक एकनाथ शिंदेंनाच खरे शिवसेनाप्रमुख मानू लागले आहेत. दुसऱ्या बाजूला आरक्षणवादी लोक आणि मुस्लिमांमुळे उद्धव ठाकरेंचा स्ट्राईक रेट वाढला आहे.

## सागरकडे जाताना मोर्चा अडवला

**मुंबई :** मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक रमेश केरे पाटील मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्याजवळ जवाब दो आंदोलन सुरू करणार होते. ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे अध्यक्ष शरद पवार यांच्याही निवासस्थानी आंदोलन करणार होते. मराठा आंदोलकांच्या मोठ्या ताफ्यासह सागर बंगल्याकडे जात असताना त्यांची गाडी अडवण्यात आली. सुरक्षेच्या कारणास्तव रमेश केरे आणि त्यांच्या इतर सहकारी आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मराठा क्रांती ठोक मोर्चाचे पदाधिकारी "जवाब दो जवाब दो, देवेंद्र फडणवीस जवाब दो" या नाऱ्याखाली फडणवीस यांच्या बंगल्यावर आंदोलन करणार होते. या पार्श्वभूमीवर मरीन ड्राइव्ह परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. केरे पाटील यांची गाडी गिरगाव चौराटी येथे पोलिसांनी अडवली. मराठा आरक्षणाबाबत उभय नेत्यांच्या भूमिका जाणून घेण्याचा ते प्रयत्न करणार होते.

# शिवसेना आमदार अपात्रता सुनावणी पुढे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शिवसेना आमदार अपात्र प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात दोन आठवडे पुढे ढकलण्यात आली आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने याचिका दाखल केली होती.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी एकत्र होईल, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्यानुसार मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने या महिन्यात दोन्ही प्रकरणी सुनावणी होणार नाही, असे आदेश दिले. सप्टेंबर महिन्यातच पुन्हा नव्याने या प्रकरणाची सुनावणी होईल, असे सांगितले आहे.

आमदार अपात्रता प्रकरणासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता शिवसेनेने केली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वकिलांना कोर्टाने कागदपत्र जमा करण्यासाठी वेळ दिला होता. मात्र, अजित पवार गटाकडून अद्याप त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेली नाही. त्यातच अजित पवार गटाने कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी दोन आठवड्यांचा कालवधी वाढवून मागितला आहे. तसेच, त्यांच्या वकिलांनीही सुनावणी पुढे ढकलावी, अशी विनंती केली होती. ही विनंती सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली.

## महामार्ग रोखला, गुन्हे दाखल

**किणी :** पुणे बंगळुरू महामार्गावरील टोल वसुली बंद करावी या मागणीसाठी आंदोलनात महामार्ग रोखणाऱ्या २२ काँग्रेस कार्यकर्त्यांवर वडगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. या बाबत माहिती अशी की, महामार्गाची झालेली दुरवस्था व सहा पदरीकरण पूर्ण झाल्याशिवाय टोलची आकारणी करू नये, यासाठी शनिवारी सकाळी काँग्रेसच्या वतीने आ. सतेज पाटील, आ. राजू आवळे, आ. जयश्री जाधव, आ. जयंत आसगावकर, आ. ऋतुराज पाटील यांचेसह कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील नेत्यांच्या नेतृत्वाखाली किणी टोल नाका येथे टोल बंद आंदोलन करण्यात आले होते.

या दरम्यान दोन्ही बाजूने वाहतूक सुरू होती तर टोल वसुली बंद होती. यादरम्यान आंदोलक व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चेच्या फेऱ्या लांबल्याने कार्यकर्त्यांचा संयम सुटला त्यांनी थेट महामार्गावर ठाण मांडत वाहतूक रोखुन धरली.

## सिंदखेड राजात

# काका विरुद्ध पुतणी?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघात गेल्या २५ वर्षांपासून निवडून येणारे डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या विरोधात त्यांची पुतणी गायत्री शिंगणे उभी ठाकली आहे. गायत्री शिंगणे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी बळ दिले आहे.

डॉ. शिंगणे यांनी शरद पवार यांची साथ सोडून अजित पवार गटात प्रवेश केल्याने सिंदखेडराजा मतदारसंघाची राजकीय समीकरणे बदलली आहेत. शरद पवार गटाच्या जिल्हा कार्याध्यक्ष गायत्री शिंगणे यांनी निवडणुकीसाठी रणशिंग फुंकले आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तहसील कार्यालयावर गायत्री शिंगणे यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला. पिक विमा मिळावा, पिक कर्ज, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळावी या प्रमुख मागण्या मोर्चाच्या माध्यमातून करण्यात आल्या. मोर्चा काढून गायत्री शिंगणे यांनी आपले काका डॉ. राजेंद्र शिंगणे यांना जोरदार आव्हान निर्माण केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सिंदखेडराजा मतदारसंघात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने दोन नावे समोर आली आहेत. परंतु, या दोन्ही नावांनी अद्याप तरी पक्षात अधिकृत प्रवेश केलेला नाही. मराठा लॉबीतला एक तरुण चेहरा म्हणून गायत्री शिंगणे यांच्याकडे पाहिले जात आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत गायत्री शिंगणे विरुद्ध राजेंद्र शिंगणे यांच्यात लढत होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## खदानीत बुडून चार मित्रांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरापासून काही अंतरावर असलेल्या झरी खदानीत बुडून चार मित्रांचा दुर्दैवी मृत्यू झाला. निसर्ग सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी पाच मित्र या परिसरात आले होते. फोटोसाठी ते खदानीत उतरले. त्या नंतर पाण्यात अंघोळ करताना पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडाले. सुदैवाने एकाचा जीव वाचला. त्याने ही माहिती नातेवाईकाना दिली. नागरिकांनी घटना स्थळी धाव घेतली. पोलिस व अग्निशामक दल तातडीने तेथे पोहोचले. दोन तास शोध घेऊन चार मृतदेह मृत पावलेले तिघे युवक बारावीत शिकतात. तिघेही देगलूर नाका भागात राहतात. खदानीबाहेर काढण्यात आले. या घटनेने शहरात दुःख व्यक्त करण्यात आले. सध्या पावसाचे वातावरण असल्याने तरुण मोठ्या संख्येने धबधबा, नदी, ओढा, तलाव अशा ठिकाणी जातात. मात्र आपल्या जीवाची पर्वा न करता पाण्यात जाणे, फोटो काढणे, सेल्फी काढणे असे प्रकार करतात.

## आंदोलन

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**नवी दिल्ली :** इंडिया आघाडीच्या नेत्यांनी संसदेबाहेर आरोग्य विमा आणि जीवन विमावर लागू केलेला जीएसटी हटवण्यात यावा यासाठी आंदोलन केले.

# शासकीय रेखाकला परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाने शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड) परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले असून, या दोन्ही चित्रकला परीक्षा २५ ते २८ सप्टेंबर या कालावधीत होणार आहेत.

सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचा अधिनियम लागू करण्यात आला आहे. त्यानुसार आता शासकीय रेखाकला परीक्षा मंडळाकडून परीक्षा घेण्यात येणार आहेत. शासनाने शासकीय रेखाकला परीक्षेच्या पुनर्रचित अभ्यासक्रमास १६ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या निर्णयानुसार मान्यता दिली आहे. त्यानुसार यंदा ही शासकीय रेखाकला परीक्षा घेण्यात येणार आहे.

संबंधित सर्व केंद्रप्रमुखांनी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची नावनोंदणी करताना दोन्हीपैकी (एलिमेंटरी किंवा इंटरमिजिएट) एकाच परीक्षेसाठी करावी. केंद्रांची नोंदणी, विद्यार्थ्यांची नोंदणी व परीक्षा शुल्क ऑनलाइन पद्धतीने संकेतस्थळावर भरावे. याबाबत पालकांसह विद्यार्थ्यांना कळवावे, असे आवाहन संचालक विनोद दांडगे यांनी केले आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट होत असलेल्या विद्यार्थ्यांची नावनोंदणी ३१ ऑगस्टपर्यंत करता येणार आहे.

२५ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १ वेळेत वस्तुचित्र, दुपारी २ ते ४ या वेळेत स्मरणचित्र, २६ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १ पर्यंत संकल्पचित्र नक्षीकाम, दुपारी २ ते ४ या वेळेत कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन या विषयाची एलिमेंटरी ड्रॉइंग ग्रेड परीक्षा होणार आहे. २७ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० ते १:३० या वेळेत स्थिरचित्र, तर दुपारी २:३० ते ४:३० स्मरणचित्र आणि २८ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० ते दुपारी १:३० संकल्पचित्र नक्षीकाम, दुपारी २:३० ते ५:३० कर्तव्य भूमिती, घनभूमिती व अक्षरलेखन या विषयासाठी इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षा होणार आहेत.

# मराठा - ओबीसी आंदोलकांचे राज लक्ष्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई / अमरावती :** महाराष्ट्रात सगळ्या गोष्टी मुबलक प्रमाणात असताना राज्यात आरक्षणाची गरजच नाही, असे विधान करणारे मनसेप्रमुख राज ठाकरे मराठा आणि ओबीसी आरक्षण आंदोलकांचे लक्ष्य झाले आहेत. ओबीसी आरक्षण आंदोलक लक्ष्मण हाके यांनी यांनी राज ठाकरे यांच्यावर तोफ डागली आहे. तर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला उचकवण्याचे प्रयत्न केले जात असल्याचे म्हटले आहे. दोघांनी राज यांचे विधान व आरक्षण विषयावर व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया :

## तुमच्या विचारांची कीव येते



राज ठाकरे यांच्या आरक्षणाबाबतच्या विचारांची कीव येते. राज ठाकरे हे मनसे संपवायला मराठवाड्याच्या दौऱ्यावर निघाले आहेत का? तुम्ही खरंच प्रबोधनकार ठाकरे यांच्या घराण्यात जन्मलात का? अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे वर्गीकरण तेव्हा करावे जेव्हा ठोस डेटा असेल. वर्गीकरण घटनाविरोधी आहे. ते अमलात आणताना अडचणी येतील.

क्रीमिलेअर सर्वांना लावाल तर आरक्षण संपुष्टात येईल. ओबीसी आरक्षणाच्या लढाईत कुणबी बांधवांनी सहभागी झाले पाहिजे. शरद पवार नेहमी इलेक्शन मोडमध्ये असतात. ओबीसी समाजाचं व्याकरण ते समजतात, पण त्यांचं अंतःकरण त्यांना समजत नाही. ते समजले असते तर शरद पवार आतापर्यंत दोन-तीन वेळा देशाचे पंतप्रधान झाले असते. मराठ्यांनी फडणवीस यांच्या बंगल्यावर जाण्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घरावर जायला हवे. महाराष्ट्राचा पुढील मुख्यमंत्री ओबीसीच असेल.

## बरळायचंय, त्याला बरळू द्या

संयम धरा, मुद्दाम उचकवण्याचे काम राज्यात सुरू आहे. कोणीही आंदोलन करू नका. ज्याला बरळायचे आहे त्याला बरळू द्या. सर्वजण स्वतःचा पक्ष वाचवण्यासाठी माझ्यावर तुटून पडले आहेत. हे त्यांचे षडयंत्र आहे. अभियान नावाचा शब्द त्याला दिला आहे. विधानसभेनंतर सत्ताच मराठ्यांची येणार आहे. तेव्हा सत्ता पलटलेली असेल. आमच्या हक्काचं ओबीसीमधले आरक्षण आम्हाला द्या. सत्तेत जाण्याशिवाय आम्हाला पर्याय नाही. राजकारण्यांना पायाखाली तुडवण्याची योग्य वेळ आहे.



मराठा आमदारांना बोलायला भाग पाडले जात आहे. १४ ते २० ऑगस्ट दरम्यान २८८ विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणार. अंतिम निर्णय २९ ऑगस्टला होणार आहे. एससी एसटीच्या जागा आहेत. त्याचाही विचार करणार आहे. इतर छोट्या छोट्या जातीचे आमदार होण्याची सुद्धा शक्यता आहे. अपक्षच बरं आहे. आघाड्या नकोच.

#रा

# गोल्डन बॉय सज्ज...



## नीरज ऑलिम्पिक भालाफेकच्या फायनलमध्ये

नीरजने या पात्रता फेरीत बी ग्रुपमध्ये खेळताना पहिल्याच प्रयत्नात ८९.३४ मीटर अंतरावर भाला फेकला. यासह त्याने अंतिम फेरीतील स्थान पक्के केले. नीरजची यंदाच्या हंगामातील हे सर्वोत्तम भाला फेकीचे अंतरही ठरले आहे. नीरज यंदा त्याचं सुवर्णपदक राखण्यासाठी अंतिम फेरीत भालाफेक करताना दिसणार आहे. त्याने टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले आहे.

## ऑलिम्पिक गेम्स पॅरिस २०२४

| पदक तक्ता / संघ | | सुवर्ण | कांस्य | रौप्य | ६ ऑगस्ट ११ वा दिवस एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | चीन | २२ | १९ | १४ | ५५ |
| २ | अमेरिका | २१ | ३० | २८ | ७९ |
| ३ | फ्रान्स | १३ | १६ | १९ | ४८ |
| ४ | ऑस्ट्रेलिया | १३ | १२ | ८ | ३३ |
| ५ | ग्रेट ब्रिटेन | १२ | १३ | १७ | ४२ |
| ६० | भारत | 0 | 0 | ३ | ३ |



# ज़माना झुकता है...!

15 सेकंदात संपूर्ण गेम उलटला

## विनेश फोगटने वर्ल्ड चॅम्पियन सुसाकीचा पराभव केला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पॅरिस:** स्टार भारतीय कुस्तीपटू विनेश फोगटने पॅरिस ऑलिम्पिकच्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये चमकदार कामगिरी केली. तिने 50 किलो वजनी गटात सध्याची ऑलिम्पिक चॅम्पियन आणि चार वेळा विश्वविजेती युई सुसाकीचा 3-2 असा पराभव केला. या सामन्यात ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती युई सुसाकी सुरुवातीला आघाडीवर होती, मात्र शेवटच्या १५ सेकंदात विनेशने टेबल फिरवले. आता त्याने उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.

लक्षात ठेवा की याआधी सुसाकीला तिच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत एकाही पराभवाचा सामना करावा लागला नाही, असे मानले जात होते की विनेशला पहिली फेरी पार करणे कठीण होईल, कारण ती जिंकलेल्या जपानी खेळाडूशी स्पर्धा करत होती. टोकियो गेम्समध्ये एकही गुण न गमावता सुवर्णपदक जिंकले. पण विनेशने अप्रतिम धाडस दाखवत संपूर्ण सामना फिरवला.

विनेश तिचे तिसरे ऑलिम्पिक खेळत आहे पण 50 किलोमध्ये ती प्रथमच आव्हानात्मक आहे. यापूर्वी ती ५३ किलोमध्ये खेळायची. विनेशने महिलांच्या 50 किलो राऊंड ऑफ 16 मध्ये विजय मिळवला आहे, आता ती सुपर-8 आणि सेमीफायनल देखील खेळणार आहे.

जागतिक चॅम्पियनशिप कांस्यपदक विजेती आणि राष्ट्रकुल खेळ, आशियाई खेळ आणि आशियाई चॅम्पियनशिप सुवर्णपदक विजेती, विनेश इतिहासातील सर्वात यशस्वी भारतीय कुस्तीपटूंपैकी एक आहे, परंतु ऑलिम्पिक खेळांमधील तिची कामगिरी निराशाजनक आहे.

विनेश, प्रसिद्ध फोगट बहिणींपैकी एक, तिने रिओ 2016 मध्ये महिलांच्या 48 किलो फ्रीस्टाइल गटात ऑलिम्पिक पदार्पण केले, परंतु गुडघ्याच्या गंभीर दुखापतीमुळे तिला उपांत्यपूर्व सामन्यातून माघार घ्यावी लागली. टोकियो 2020 मध्ये महिलांच्या 53 किलो गटातील उपांत्यपूर्व फेरीत जिंकण्याची प्रबळ दावेदार मानल्या जाणाऱ्या विनेशला पुन्हा एकदा उपांत्यपूर्व फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले.

# महाराष्ट्राच्या विक्रमादित्य ७ गुणांसह आघाडीवर




**पुणे :** आंतरराष्ट्रीय मानांकित खुल्या बुध्दिबळ स्पर्धेमध्ये आठव्या फेरीअखेर इंटरनॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी महाराष्ट्र ७ गुणांसह आघाडीवर आहे.

अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघ, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना, पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेने ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेची ८ वी फेरी खेळली गेली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रचे विक्रमादित्य कुलकर्णी याने युनियन बँकेचे रामकृष्ण जे. याचा ७-६ असा पराभव केला.केला. महाराष्ट्राच्या सौरभ म्हमाणे याचा आपलाच सहभागी श्रीराज भोसले यांच्या समवेत ६.५ गुणांसह बरोबरीत सामना सुटला. अंदलामाला हेमल वर्षान याने पश्चिम बंगालच्या शौनक मझुमदार याला ६.५-५.५ गुणांसह पुढे चाल दिली.

### मुलांच्या गटाच्या शालेय फुटबॉल स्पर्धेत

# एचडीएफसी स्कूल, दिल्ली पब्लिक स्कूल. सी. एम. इंटरनॅशनल, पोद्दार नॅशनल स्कूल विजयी

**पुणे :** शिक्षण विभाग (पुणे मनपा) आणि जिल्हा क्रीडा परिषद पुणे आयोजित चौदा वर्षांखालील मुलांच्या गटाच्या शालेय फुटबॉल स्पर्धेत एचडीएफसी स्कूल, दिल्ली पब्लिक स्कूल. सी. एम. इंटरनॅशनल, मांजरीच्या पोद्दार नॅशनल स्कूल, मिलेनियम नॅशनल स्कूल, विद्याशिल्प पब्लिक स्कूलने प्रतिस्पर्ध्यांना हरवून विजयी सलामी दिली. या स्पर्धेत सहा सामन्यांत मिळून ३२ गोल नोंदविले गेले.

'बीएमसीसी'च्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत एचडीएफसी. स्कूलने येरवड्याच्या विबग्योर स्कूलवर टायब्रेक अखेर ५-४ अशा गोलने मात केली. या लढतीत निर्धारित वेळेत दोन्ही संघांनी तोडीस तोड खेळ केला परंतु गोल होऊ शकला नाही. निर्धारित वेळेत सामना गोलशून्य बरोबरीत सुटल्याने टायब्रेकचा अवलंब करण्यात आला. टायब्रेकमध्ये 'एचडीएफसी'कडून सूर्यनारायण स्वामी, ईशान गोस्वामी, तक्षिल बिंचर, आदित्य चौधरी, ईशान तिमेग्रा या पाचहीजणांनी गोल नोंदवले, तर विबग्योरकडून देवम मोरे वगळता अर्णव पेजगुडे, कृतार्थ भट, शौर्य पटेल, विराटसिंह हे चौघेच गोल नोंदवू शकले.

# रामन इंटरनॅशनल व विबग्योर स्कूलची विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण विभाग (पुणेमनपा) आणि जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्यातर्फे आयोजित चौदा वर्षांखालील गटाच्या शालेय फुटबॉल स्पर्धेत मुलींच्या गटात0रायन इंटरनॅशनल स्कूल, विबग्योर स्कूल आणि अभिनव इंग्रजी माध्यम प्रशालेने प्रतिस्पर्ध्याला हरवून विजयी सलामी दिली. या स्पर्धेत तीन सामन्यात मिळून ११ गोल नोंदविले गेले.

बीएमसीसीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत वैदेही जोशीने नोंदवलेल्या दोन (८, १३ मिनीट) गोलच्या जोरावर अभिनव इंग्रजी माध्यम प्रशालेने पंडित दिनदयाळ उपाध्याय शाळेवर (मनपा शाळा क्रमांक ७४) २-० अशा गोल फरकाने विजय नोंदविला या लढतीत अभिनव प्रशालेच्या खेळाडूंनी वेगवान खेळ करत वर्चस्व ठेवले होते. शैली राजपूतने (९, १८ व २२ वे मिनीट) केलेल्या तीन गोलच्या जोरावर रायन इंटरनॅशनल स्कूलने एरंडवण्यातील डॉ. श्यामराव कलमाडी स्कूलवर ७-० अशी मात केली. या लढतीत रायन इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंनी जोरदार खेळ केला. खेळाच्या दुसऱ्याच मिनिटास आदित्री कोठियालने गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. तर अद्विता पवारने आणखी दोन गोल (४ व ७ वे मिनीट) केल्यानंतर सखी रसाळने (१५ वे मिनीट) एक गोल केला.

# इव्हा मालवणकर व निया पतंगे ने पटकाविले कांस्यपदक

## राष्ट्रीय फिन स्विमिंग स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्रातील फिन स्विमर्स यांनी राजस्थानच्या उदयपूर येथील खेळगांव मध्ये आयोजित राष्ट्रीय फिन स्विमिंग चॅपियनशिपमध्ये ध्रुव ग्लोबल स्कूलच्या ६ वीं तील इव्हा मालवणकर आणि ८ वी तील निया पतंगे यांनी कांस्यपदक पटकावून आपली प्रतिभा दाखविली आहे.

राष्ट्रीय स्तरावर आयोजित या स्पर्धेत वेस्ट बंगाल, गुजरात, तेलंगणा, महाराष्ट्र आणि राजस्थान येथील अनेक शाळांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये वैयक्तिक ११ आणि १४ वर्षाखालील मुलींच्या ५० मी. मोनोफिन व २०० मी. बायोफिन या प्रकारात ध्रुव ग्लोबल स्कुलमधील ६ वी तील इव्हा मालवणकर आणि २०० मी. बायोफिन प्रकारात ८ व्या वर्गातील निया पतंगे ने अप्रतिम खेळाचे प्रदर्शन करून पदकावर आपले नाव कोरले. त्यांनी स्नोर्कल आणि फिन्स वापरून अतिशय अवघड अशा प्रकारात उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकलीत. यांच्या यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक संजय मालपाणी, शाळेचे विश्वस्त यश मालपाणी व प्रिन्सीपल संगीता राऊतजी यांनी कौतुक केले.






# महाराष्ट्राच्या अविरतला जेतेपदाचा मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राच्या अविरत चौहानने साडेसात गुणासह यू इन स्पोर्ट्स खुल्या फिडे मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद संपादिले. या स्पर्धेत पहिल्या पटावर श्रीराज भोसलेने विक्रमादित्य कुलकर्णीचा तर तिसऱ्या पटावर अविरत चौहानने अनुष्का कुतवळला हरविले होते. अविरत चौहान व श्रीराज भोसलेचे प्रत्येकी साडेसात गुण झाले होते. सरस टायब्रेकच्या आधारावर अविरत चौहान विजेता ठरला. सौरभ म्हमाणे, अंदलामाला वर्षान, प्रथमेश शेरला, विक्रमादित्य कुलकर्णी, रामकृष्ण जे., ऋषिकेश कबनुरकरने प्रत्येकी सात गुणांसह चार ते आठ क्रमांकात यश मिळविले. या स्पर्धेच्या बक्षिस समारंभप्रसंगी विलास इंगोले, श्रीधर खांडेकर, जय पलोडिया, विनिता श्रोत्री, रोशनकुमार इंगवले, योगेश रवंदळे, राजेंद्र कोंडे हे उपस्थित होते.

# रोलबॉल स्पर्धेत परांजपे विद्यालय संघाला विजेतेपद

**पुणे :** जिल्हास्तरीय सबज्युनियर गटाच्या रोलबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात परांजपे विद्यालय (बीवीबी) संघाने विजेतेपद पटकाविले. मुलांच्या गटातील अंतिम लढतीत कोथरूडच्या परांजपे (बीवीबी)

विद्यालयाने महेश विद्यालय मराठी माध्यमचा ४-३ असा एक गोलने पराभव केला. यावेळी विजेत्या संघाकडून भूषण शिंदे, स्वराज वडेराव, समर्थ पुजारी आणि समर्थ धावारेने सुरेख खेळ केला.

# नाशिक मॉन्सून रॅलीत अमरेंद्र प्रथम

**पुणे :** नाशिकमध्ये २ नुकत्याच झालेल्या 'स्पोर्ट्सक्राफ्ट नाशिक मॉन्सून रॅली' स्पर्धेत पुण्याच्या अमरेंद्र साठेने इलेक्ट्रिक वर्गवारीत प्रथम क्रमांक आणि वेटरन वर्गात द्वितीय क्रमांक संपादिला.

पावसात २१ किमीच्या अंतरावर पार पडलेली ही स्पर्धा अत्यंत खराब रस्त्यांवर झाली यांत अमरेंद्र साठेने ही शर्यत २६.३५ No M R मिनिटात पूर्ण केली. स्पर्धेसाठी एथर 9 इलेक्ट्रिक व राइस टायर्सचे प्रायोजकत्व मिळाले. त्यांच्या बाइकची तयारी नीरज वंजाळे यांनी केली होती. साठे यांच्या या यशाने मोटार स्पोर्ट्समध्ये पुण्याला नवा मान मिळाला आहे.

### योनेक्स सनराईज ईगल आय टाईम अटॅक स्पर्धा

# अनन्या, पर्णवी, अपूर्वा,जयंत, मनाली यांची बॅडमिंटन स्पर्धेत आगेकूच



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा मेट्रोपॉलिटन बॅडमिंटन संघटना(पीडीएमबीए) यांच्या वतीने योनेक्स सनराईज ईगल आय टाईम अटॅक बॅडमिंटन स्पर्धेत अनन्या बोंद्रे, पर्णवी मोहळकर, अपूर्वा घोळवे,जयंत कुलकर्णी, मनाली देशपांडे यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

पी.ई. सोसायटीज मॉडर्न पीडीएमबीए स्पोर्टस कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत 15 वर्षांखालील मुलींच्या गटात उपांत्यपूर्व फेरीत


अनन्या बोंद्रेने शताक्षी देशपांडेचा 49-35 असा तर,

पर्णवी मोहळकरने रिया चोपडाचा 54-42 असा पराभव करून उपांत्य फेरीत धडक मारली.

पुरुष एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत जयंत कुलकर्णीने यश तावरेवर 36-32 असा विजय मिळवला. जयेश निंबाळकरने राजू ओव्हाळचा 44-26 असा तर,

मुज्जमिल अन्सारीने रुचिर प्रभुणेचा 50-39 असा पराभव केला. अमेय शिंगवीने ध्रुव निकमवर 41-36 असा विजय मिळवला. महिला एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत

मनाली देशपांडेने नक्षत्र झरेला 72-31 असे पराभुत केले.



**निकाल: 15 वर्षांखालील मुले:** उपांत्यपूर्व फेरी:
आरुष अरोरा वि.वि.अतिक्ष अग्रवाल 60-27;
ध्रुव बर्वे वि.वि.श्रावण देशमुख 51-27;
वत्सल तिवारी वि.वि.शौर्य नाईक 50-30;
माधव कामथ वि.वि.दिव्यान कौशिक 48-35;
**15 वर्षांखालील मुली:** उपांत्यपूर्व फेरी:
अनन्या बोंद्रे वि.वि.शताक्षी देशपांडे 4935;
पर्णवी मोहळकर वि.वि.रिया चोपडा 54-42;
अपूर्वा घोळवे वि.वि.शिवानी मसलेकर 39-30;
समन्वय धनंजय वि.वि.अरुंधती कोंवर 45-32;
**17 वर्षांखालील मुले:** उपांत्यपूर्व फेरी:
श्रेयस मसलेकर वि.वि.नील शेरॉन 32-31;
ध्रुव बर्वे वि.वि.नंदन मुथा 40-33;
रिशन शेंबेकर वि.वि.वत्सल तिवारी 38-31;
ऋग्वेद भोसले वि.वि.ईशान आगाशे 47-29;
**17 वर्षांखालील मुली:** उपांत्यपूर्व फेरी:
शर्वरी वरवंटकर वि.वि.दुर्गा आघाव 45-36;
अपूर्वा घोळवे वि.वि.अनन्या बोंद्रे 38-27;
प्रांजली सातपुते वि.वि.सई रानडे 59-19;
**19 वर्षांखालील मुले:** उपांत्यपूर्व फेरी:
जोसेफ जिथू वि.वि.असीम श्रोत्रिया 39-30;
इशान कौशिक वि.वि.अथर्व पवार 41-31;
श्रेयस मसलेकर वि.वि.वैष्णव गोळे 64-37;
इशान आगाशे वि.वि.शमित करडे 50-47;
**पुरुष एकेरी:** उपांत्यपूर्व फेरी:
जयंत कुलकर्णी वि.वि.यश तावरे 36-32;
जयेश निंबाळकर वि.वि.राजू ओव्हाळ 44-26;
मुज्जमिल अन्सारी वि.वि.रुचिर प्रभुणे 50-39;
अमेय शिंगवी वि.वि.ध्रुव निकम 41-36;
**महिला एकेरी:** उपांत्यपूर्व फेरी:
मनाली देशपांडे वि.वि.नक्षत्र झरे 72-31;
प्रांजली सातपुते वि.वि.अदिती साठे 93-06;
सानिका रेळेकर वि.वि.अंजना कल्लापूर 45-32.